## एसटीला संजीवनी; ‘लाल परी’च्या ताफ्यात ५००० नव्या बसेस



**मुंबई :** सामान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या एसटीच्या ताफ्याला आता आधुनिकतेची नवी झळाळी मिळणार आहे. पाच हजार ‘लाल परी’ बसेसच्या खरेदीची निविदा प्रक्रिया आता पूर्ण झाली असून टाटा मोटर्सने सर्वात कमी दराचा देकार दिला आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी नुकतीच दिली आहे. दरम्यान, या नव्या बसेसमुळे ग्रामीण महाराष्ट्राची ‘लोकवाहिनी’ असलेल्या एसटीला आता अधिक बळकटी मिळणार आहे. यामुळे जुन्या बसेसवरील ताण कमी होईल. सध्या सुरू असलेल्या बसफेऱ्यादेखील वाढतील आणि प्रवाशांना चांगली सेवा मिळेल. गळक्या आणि बंद पडणाऱ्या बसेसच्या समस्येवरही लवकरच मात करता येणार आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ५९
www.ramprahar.com

◆ सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


लोकअदालत न्यायदानाची सर्वसमावेशक चळवळ/२

नवी मुंबईमध्ये अंगण दत्तक योजना/६

शेल्टन विरुद्ध इवेरेव होणार अंतिम लढत/८


# देशात २०२९पूर्वी समान नागरी कायदा

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची मुंबईत मोठी घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

२०२९ पूर्वी देशात समान नागरी कायदा लागू करणार असल्याची मोठी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी (दि. १३) मुंबईत केली. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएची सत्ता असलेल्या सर्व २१ राज्यांमध्ये समान नागरी कायदा (UCC) लागू करू, असा विश्वास त्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. अनेक राज्यांमध्ये आधीच UCC लागू केला असल्याचेही त्यांनी सांगितले.



यावेळी भाजप सरकारने रक्ताचा एकही थेंब न सांडता कलम ३७० हटवले. देशात घुसखोरी करणाऱ्यांना शोधून देशाबाहेर काढणार, असा स्पष्ट इशारा शाह यांनी दिला. देशातील माओवादाचा पूर्ण खात्मा करून देशाला मुक्त केल्याचा दावाही त्यांनी केला. सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक आणि ‘ऑपरेशन सिंदूर’मुळे दहशतवादाबाबत ‘झीरो टॉलरन्स’चे धोरण प्रस्थापित झाल्याचे त्यांनी सांगितले. जेन झीच्या नेतृत्वाखालील आंदोलनाबाबत बोलताना शहा म्हणाले की, “आपण लोकशाहीत आहोत. विविध मुद्द्यांवर मते भिन्न असू शकतात. भाजप सत्तेवर आहे, पण आम्ही आणीबाणी लादून राज्य कारभार करू शकत नाही. ती काँग्रेसची संस्कृती आहे, आमची नाही. आमचा संवादावर विश्वास आहे.

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान सेवा अभियान राबवणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. मातृभाषेच्या मुद्द्यावर शाह म्हणाले की, मातृभाषेला प्राधान्य देणे हे सरकारचे धोरण आहे. संविधानानेही राज्यांना निर्देश दिले आहेत. हा मोठा मुद्दा बनणार नाही. गेल्या १२ वर्षांत देशाची जागतिक प्रतिष्ठा उंचावल्याचे सांगत शाह म्हणाले की, आज भारताच्या पंतप्रधानांच्या मताला विशेष महत्त्व दिले जाते. भारतीय पासपोर्टचे मूल्य मोदींनी वाढवले आहे. विविध सर्वेक्षणांमध्ये ६८ टक्के अप्रूव्हल रेटिंगसह ते जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते आहेत. ३६ देशांनी त्यांना सर्वोच्च सन्मान दिले आहेत.

२०१४ पूर्वीचे राजकारण भ्रष्टाचार, जातिवाद आणि घराणेशाहीने ग्रासले होते. २०१४ ते २०२६ या काळात कामगिरीवर आधारित राजकारणाकडे देश वळला. ‘भारत प्रथम’ हेच धोरण असल्याचे त्यांनी सांगितले. ‘फ्रजाइल फाइव्ह’मधून आपण जगातील पहिल्या पाच अर्थव्यवस्थेत आलो, असेही शाह म्हणाले.

## गणरायाच्या स्वागतासाठी समस्त रायगडवासीय सज्ज!

### जिल्ह्यात एक लाखांहून अधिक गणेशमूर्तींची होणार प्रतिष्ठापना



**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त रायगड जिल्ह्यात २९१ सार्वजनिक आणि एक लाख पाच हजार ५४ घरगुती अशा एकूण एक लाख पाच हजार ३४५ गणेशमूर्तींची सोमवारी (दि. १४) प्रतिष्ठापना होणार आहे. गणरायाच्या आगमनासाठी रायगड जिल्हा सज्ज झाला आहे. गणेशभक्त आपल्या लाडक्या बाप्पाच्या स्वागताच्या तयारीत मग्न आहेत. गणरायाच्या सेवेत कोणतीही कमतरता राहू नये यासाठी गणेशभक्तांची लगबग सुरू असून तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

रंगरंगोटी पूर्ण झाली असून सजावटीचे साहित्य खरेदी करण्यात भक्त व्यस्त आहेत. बाजारपेठा फुलल्या आहेत. चाकरमानी आल्यामुळे घरात उत्साहाचे वातावरण आहे. सजावट साहित्याच्या किमतीत १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली. गणेशभक्तांचा कल इकोफ्रेंडली आरासकडे आहे. थर्माकोललाही मोठी मागणी आहे. बाजारात दीड फुटापासून साडेचार फुटांपर्यंत मखर उपलब्ध आहेत. सजावटीचे व पूजेचे साहित्य खरेदीसाठी गणेशभक्तांची झुंबड उडत आहे.

## पनवेलमध्ये दिव्यांग असेसमेंट कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आणि ALIMCOच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष ADIP योजनेअंतर्गत पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या असेसमेंट कॅम्पला मोठा प्रतिसाद लाभला. चांगू काना ठाकूर महाविद्यालयात रविवारी (दि. १३) आयोजित या शिबिरात आतापर्यंत ५८०हून अधिक दिव्यांग लाभार्थ्यांचे असेसमेंट पूर्ण झाले असून साडेसहाशेहून अधिक जणांनी नोंदणी केली आहे.




यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, दिव्यांग बांधवांचे जीवन अधिक सुलभ व्हावे आणि त्यांना आवश्यक सहाय्यक साधने उपलब्ध व्हावीत या उद्देशाने केंद्र सरकार आणि ALIMCO सातत्याने कार्यरत आहेत. या शिबिराच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या गरजेनुसार व्हीलचेअर, ट्रायसायकल, श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव, स्मार्टफोन आदी सहाय्यक साधनांचे वितरण करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी कृपेश कांडपिळे, चेतन जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्ते, स्वयंसेवक, महाविद्यालय प्रशासन आणि ALIMCOचे अधिकारी **(पान २...)**

## मुंबई-बंगळुरू महामार्गावर भीषण अपघात; दोघांचा मृत्यू, १२ जखमी

**पुणे : प्रतिनिधी**

मुंबई-बंगळुरू महामार्गावरील जांभूळवाडी परिसरातील दरी पुलावर शनिवारी मध्यरात्री चार वाहनांचा भीषण अपघात झाला. दोन ट्रक आणि दोन मोटारींच्या या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून १२ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

शनिवारी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास एक ट्रक साताऱ्याच्या दिशेने मुंबईकडे जात होता. जांभूळवाडी येथील दरी पुलाजवळ ट्रकचालक प्रमोद वाघ यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर ट्रक त्याच लेनमधून पुढे जाणाऱ्या आयशर ट्रकवर आदळला. त्याच वेळी समोरून येणाऱ्या एर्टिगा आणि टाटा अल्ट्रोझ या दोन मोटारींना ट्रकने जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत टाटा अल्ट्रोझमधील आनंदीबाई वाडकर (५०, रा. नेरूळ, नवी मुंबई) आणि हृदयनाथ गायकवाड (रा. जोगेश्वरी, मुंबई) यांचा मृत्यू झाला, तर १२ जण जखमी झाले आहेत.



**पनवेल :** वृत्तपत्र ‘रायगड शिवसम्राट’च्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आरती संग्रहाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी प्रकाशन करण्यात आले. यावेळी ‘रायगड शिवसम्राट’चे संपादक रत्नाकर पाटील, खालापूर पं. स.चे विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, पत्रकार सुभाष वाघपंजे आदी उपस्थित होते.

## निवडक

### मुंबई विमानतळावरून तब्बल पाच कोटींचे सोने जप्त

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून परदेशी बनावटीच्या सोन्याची तस्करी करणारे संघटित जाळे महसूल गुप्तचर संचालनालयाने उद्ध्वस्त केले. या कारवाईत ३.४७ किलो सोन्याची धूळ मेणाच्या आठ कॅप्सूलमध्ये लपवून आणल्याचे उघड झाले. जप्त सोन्याची किंमत पाच कोटी ४७ लाख आहे. डीआरआयच्या पथकाला मिळालेल्या माहितीनंतर ही कारवाई करण्यात आली.

### गणेशोत्सवासाठी निघालेल्या तरुणाचा अपघातात दुर्दैवी मृत्यू

**खेड :** मुंबई-गोवा महामार्गावर खेड तालुक्यातील खवटीजवळ दुचाकी ३० फूट दरीत कोसळली. या अपघातात पोलादपूरचा सतीश निवृत्ती पाटील (२९) याचा जागीच मृत्यू झाला, तर सोबत असलेली चिपळूणची अक्षता कवडे गंभीर जखमी झाली आहे. गणेशोत्सवासाठी गावी जाताना पहाटे हा अपघात घडला.

## खारघरमध्ये जिल्हास्तरीय वुशू स्पर्धा उत्साहात; ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्रीडा विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेचे आयोजन रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथे करण्यात आले. स्पर्धेत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांतील ३५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या क्रीडा कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील व अजिंक्य भगत यांना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेस तालुका क्रीडा समन्वयक समीर रेवाळे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून स्पर्धकांना प्रोत्साहन दिले. यावेळी विविध शाळा-महाविद्यालयांचे क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक तसेच क्रीडाप्रेमी उपस्थित होते. क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, महेंद्र पाटील व अजिंक्य भगत यांनी आयोजनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या नियोजनातून आणि सहकार्याने संपूर्ण स्पर्धा शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.



यावेळी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व आयोजक, क्रीडा शिक्षक, स्पर्धेचे प्रभारी तसेच सहभागी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी ॲड. राहुल घरत, प्राचार्या डॉ. निशा नायर आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करावी आणि आपल्या उत्कृष्ट कामगिरीने विद्यालयाचे व संस्थेचे नाव उज्ज्वल करावे, असा शुभेच्छापर संदेशही त्यांनी दिला.

## राम प्रहर
### मंगळवारचा अंक नाही

गणेश चतुर्थीनिमित्त ‘राम प्रहर’च्या कार्यालयास सोमवारी सुट्टी असल्यामुळे मंगळवार (दि. १५)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी. **गणेशोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा!**

**-मुख्य संपादक**

## पाचगणीतून ‘लष्कर’चा दहशतवादी अटकेत

**सातारा : प्रतिनिधी**

मुंबईतील व्यावसायिकाला धमकावल्याप्रकरणी पाचगणीतून मुंबई गुन्हे शाखेने मोहम्मद शफीक लोन (३९) याला अटक केली. तपासात त्याचे पाकिस्तानातील प्रतिबंधित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाशी थेट संबंध असल्याचे उघड झाले आहे.

दरम्यान, त्याचा भाऊ याच संघटनेत कमांडर असल्याचे समजते. सोशल मीडियाद्वारे पाकिस्तानी हँडलरच्या संपर्कात राहून त्याने धमकी दिल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी त्याच्याकडून दोन मोबाइल आणि एक डायरी जप्त केली असून अन्य साथीदारांचा शोध सुरू आहे.

## गणेशभक्तांसाठी दुसरी मोदी एक्स्प्रेस कोकणाकडे रवाना

**मुंबई : प्रतिनिधी**


गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना दिलासा देण्यासाठी दुसरी ‘मोदी एक्स्प्रेस’ रविवारी (दि. १३) मुंबईहून कोकणच्या दिशेने रवाना झाली. कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांच्या पुढाकारातून ही विशेष रेल्वेसेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दादर रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १४वरून नितेश राणे यांनी हिरवा झेंडा दाखवत विशेष रेल्वेला रवाना केले. गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे रेल्वे आरक्षण मिळवण्यासाठी चाकरमान्यांना मोठी धावपळ करावी लागते.



या पार्श्वभूमीवर ‘मोदी एक्स्प्रेस’मुळे गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळत आहे. नितेश राणे यांच्या माध्यमातून गेल्या १४ वर्षांपासून गणेशोत्सवात कोकणवासीयांसाठी ही विशेष रेल्वेसेवा उपलब्ध करून दिली जात असल्याचे सांगण्यात आले.







# लोकअदालत न्यायदानाची सर्वसमावेशक लोकचळवळ -न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रत्येक नागरिकाला कोणताही सामाजिक अथवा आर्थिक भेदभाव न करता सुलभ, परवडणारा आणि प्रभावी न्याय मिळवून देणे हे संविधानाचे मूलभूत उद्दिष्ट आहे. 'लोकअदालत' ही संकल्पना याच संवैधानिक कटिबद्धतेचे मूर्त स्वरूप असून, न्याय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणारी ती एक सर्वसमावेशक लोकचळवळ आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा रायगड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांनी केले.



रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घघाटन न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांच्या हस्ते दृकश्राव्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. बी. अग्रवाल होते. राष्ट्रीय लोकअदालतीच्या उद्घघाटन सोहळ्याला जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता ॲड. संतोष पवार, जिल्हा न्यायाधीश-१ एस. आर. तिवारी, जिल्हा न्यायाधीश-२, जिल्हा न्यायाधीश-३ एस. डी. भगत, नेर्लेकर, न्यायाधीश वरिष्ठ स्तर बी. बी. गवारे दिवाणी, मुख्य न्यायदंडाधिकारी डी. एम. झाटे, सर्व न्यायिक अधिकारी, अलिबाग वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, उपाध्यक्ष ॲड. ए. डी. पाटील, तसेच विधीज्ञ, पोलीस अधिकारी व कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी आणि पक्षकार मोठ्या संख्येने यावेळी प्रत्यक्ष उपस्थित होते.

न्यायमूर्ती साठ्ये म्हणाले की, न्यायदान म्हणजे केवळ वादावर निवाडा करणे नव्हे, तर समाजातील शेवटच्या घटकालाही आपल्या तक्रारीचे निवारण करून घेण्यासाठी न्याय्य आणि प्रभावी संधी उपलब्ध करून देणे होय. 'लोकअदालत' या संज्ञेतच 'लोकांचे न्यायालय' हा व्यापक आशय सामावलेला आहे. न्यायप्रक्रिया सर्वसामान्यांच्या अधिक जवळ नेणे आणि पक्षकारांना परस्पर संवाद व सामंजस्यातून वाद मिटविण्याची संधी उपलब्ध करून देणे, हे या व्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. लोकअदालत यशस्वी होण्यासाठी न्यायिक अधिकारी, विधीज्ञ, विधी सेवा प्राधिकरण, पॅनेल सदस्य, न्यायालयीन कर्मचारी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पक्षकार यांचा सकारात्मक व सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

लोकअदालत ही पक्षकारांना आपले वाद परस्पर सहमतीने, जलद आणि सौहार्दपूर्ण वातावरणात निकाली काढण्याची प्रभावी संधी असल्याचे सांगितले. लोकअदालतीच्या माध्यमातून जास्तीत जास्त प्रकरणे सामंजस्याने निकाली काढून पक्षकारांनी या व्यवस्थेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

### तडजोडीसाठी तब्बल २७ हजार ८७५ प्रकरणे

*या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांमधील ८ हजार ७०३ प्रलंबित प्रकरणे आणि विविध संस्था व आस्थापनांशी संबंधित १९ हजार १७२ वादपूर्व प्रकरणे, अशी एकूण २७ हजार ८७५ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली. त्यामुळे मोठ्या संख्येने पक्षकारांना प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेऐवजी संवाद, परस्पर सहमती आणि सामंजस्याच्या माध्यमातून आपले वाद निकाली काढण्याची संधी उपलब्ध झाली.*

## मंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य आणि रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाआरोग्य व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमास उत्तम प्रतिसाद लाभला.

नगरसेवक गणेश सपकाळ यांच्या कार्यालयाच्या जागेवर १२ सप्टेंबर रोजी महाआरोग्य शिबीर व रक्तदान शिबिराला सुरुवात झाली. या शिबिराचे उद्घाटन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते पार पडले. शिबिरात ५०४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी योगदान देणारे तानाजी मोहिते यांचा प्रमाणपत्र व भेटरुपी आकर्षक वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या महाआरोग्य शिबिरात डोळे, मोती बिंदू, कर्करोग तपासणी, मोफत चष्मे वाटप, कान तपासणी व श्रवण यंत्र वाटप, टूडी इको, इसीजी, बाहेरून तपासणी व मोफत औषधे, नवजात मुलींना वयाच्या सहाव्या महिन्यापर्यंत मोफत तपासणी करण्यात आली. तसेच सर्वसामान्य रुग्णांसाठी रुग्णवाहिका व लहान मुलांच्या साठी एनआयसीयु रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा देखील वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते पार पडले.

उपक्रम यशस्वी होण्यासाठी दिवसरात्र मेहनत घेतलेल्या रवींद्र राजीवडे, मंगेश साळेकर, भाऊसाहेब सावंत, करण म्हात्रे, कल्पेश म्हात्रे, सुनील साळेकर, साई शेलार, दिनकर पाटील, निखिल म्हात्रे, सचिन जाधव, सचिन हजारे, प्रितेश गायकवाड, मयुर जैन, पवन सोंडकर, संजय शिरसाठ, संजय क्षीरसागर, रोहन शेलार, अविनाश कारंडे यांचे कौतुक करण्यात येत आहे. ॲपेक्स हॉस्पिटलचेही बहुमूल्य सहकार्य लाभले.



## रोहा बाजारपेठेत भाविकांची तुफान गर्दी; वाहतूक कोंडी सोडवताना पोलिसांची दमछाक



**रोहा : प्रतिनिधी**

गणपती उत्सवासानिमत्त खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात रोहा बाजार पेठेत भाविक आल्याने रोहा बाजारपेठेत तुफान गर्दी होती. बाजारपेठेतील सर्व दुकाने तुंडुब गर्दीने भरली होते.

गणेशोत्सवाला सोमवारपासून सुरुवात होत आहे आपल्या लाडक्या बाप्पाच्या उत्सवासाठी रोहेकर सज्ज झाले असून मोठ्या प्रमाणात रोहा मध्ये गणेश भक्तांची गर्दी दिसून आली. मिळेल त्या वाहनाने आपल्या गावी गणेश भक्त येत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोहा बाजारपेठेत येणारे भाविक होते. तर दुसरीकडे गणेश उत्सवानिमित्ताने खरेदीसाठी आलेले भक्तगणांची गर्दी दिसून आली. त्याचबरोबर दुचाकी किंवा चारचाकी वाहनांची गर्दी दिसून आली. रोहा बाजारपेठेत फळे, फुले, सजावटीसाठी लागणारे साहित्य, प्रसादा साठी लागणारे पेढे व इतर प्रसाद, पूजेसाठी लागणारे नारळ व अन्य साहित्य ही खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी बाजारात दिसून आली.

मोठ्या प्रमाणात आलेल्या गर्दीमुळे रोहा बाजारपेठेत सातत्याने वाहतूक कोंडी होत होती. परंतु पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची वाहतूक सोडवण्यासाठी चोख कामगिरी चालू होती. ही वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलीस व होमगार्ड यांची दमछाक होताना दिसून आली.

## गणेशोत्सवासाठी पाली नगरपंचायतीची जय्यत तयारी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाली शहरातील गणेशभक्तांना सुरक्षित व सुविधाजनक वातावरण मिळावे, यासाठी पाली नगरपंचायतीने आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. गणपती विसर्जन घाटाची दुरुस्ती व सुशोभीकरण करण्यात आले असून, नगरपंचायतीच्या हद्दीतील विविध विसर्जनस्थळीही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे गणेशोत्सवातील विसर्जन सोहळा सुरळीत पार पाडण्यासाठी नगरपंचायतीची यंत्रणा सज्ज झाली आहे.



गणपती विसर्जन घाट परिसरातील स्वच्छता, दुरुस्ती व सुशोभीकरणाची कामे पाली नगरपंचायतीकडून पूर्ण करण्यात आली आहेत. घाट परिसरात गणेशभक्तांना विसर्जनावेळी कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक बाबींची पाहणी करून व्यवस्था करण्यात आली आहे.

दीड, पाच, सात तसेच दहा दिवसांच्या गणपतींच्या विसर्जनावेळी घाटावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या पार्श्वभूमीवर विसर्जन प्रक्रिया शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडावी, यासाठी नगरपंचायतीकडून नियोजन करण्यात आले आहे.पाली नगरपंचायतीच्या हद्दीत ज्या-ज्या ठिकाणी गणेशमूर्तींचे विसर्जन केले जाते, त्या सर्व ठिकाणी स्वच्छता व आवश्यक व्यवस्थेची कामे करण्यात आली आहेत. विसर्जनस्थळांची पाहणी करून गणेशभक्तांना अडचण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या काळात वाढणारी गर्दी लक्षात घेता संबंधित ठिकाणी स्वच्छता व व्यवस्थापनाची कामे सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने नगरपंचायतीकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, गणपती विसर्जन घाटाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. माजी खासदार धैर्यशील पाटील आणि आमदार रवींद्र पाटील यांच्या पुढाकाराने हे काम करण्यात आले आहे.पावसाळ्यात चिखल, खड्डे आणि खराब रस्त्यामुळे विसर्जनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांना होणारी गैरसोय लक्षात घेता, काँक्रिटीकरण झालेल्या रस्त्यामुळे घाटाकडे जाणारी वाहतूक व भाविकांची ये-जा अधिक सुलभ होणार आहे. गणेशमूर्ती घेऊन येणाऱ्या भाविकांसाठीही या मार्गामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

गणेशोत्सव शांततेत आणिसुरळीत पार पडावा, यासाठीनगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष,नगरसेवक, मुख्याधिकारी,अधिकारी व कर्मचारी नियोजनात सक्रिय आहेत.

## श्री गणेशोत्सवाच्या सुव्यवस्थेसाठी नवी मुंबई महानगरपालिका सज्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

यावर्षी 'श्रीगणेशोत्सव २०२६' दि.१४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत उत्साहात संपन्न होत असून नवी मुंबईकर नागरिकांनी इकोफ्रेंडली – प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन महापौर सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने यापूर्वीच करण्यात आले आहे व त्याला सुजाण नवी मुंबईकर नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने गणेशोत्सवाकरिता सार्वजनिक ठिकाणी मंडप उभारण्यासाठी परवानगी अर्ज करण्याची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्याकरिता प्रत्येक विभाग कार्यालयात विशेष कक्ष स्थापित करण्यात आला होता. या सुविधेचाही गणेशोत्सव मंडळांना चांगला लाभ झाला.



१४० हून अधिक गणेशोत्सव मंडळांनी मंडप परवानगीसाठी ऑनलाईन अर्ज केले आहेत. एकाच ठिकाणी संबंधित सर्व विभागांच्या परवानग्या उपलब्ध झाल्या असल्याने मंडळांनी समाधान व्यक्त केले आहे.

मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ६ फूटांपर्यंतच्या श्रीमूर्ती कृत्रिम तलावतच विसर्जित करावयाच्या असून त्याबाबत नागरिकांना विविध माध्यमांतून आवाहन करून प्रबोधन करण्यात आले आहे. त्यादृष्टीने तब्बल १७० इतक्या मोठ्या प्रमाणात कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

सर्व विसर्जन स्थळांवर महानगरपालिकेच्या वतीने सुयोग्य व्यवस्था करण्यात आलेली असून नैसर्गिक २२ विसर्जन स्थळांव्यतिरिक्त नागरिकांची श्रीमूर्ती विसर्जनासाठी एके ठिकाणी होणारी गर्दी टाळावी व त्यांना आपल्या घरापासून जवळच विसर्जन करता यावे तसेच जलप्रदूषणाला प्रतिबंध होऊन इकोफ्रेन्डली गणेशोत्सव साजरा व्हावा यादृष्टीने कृत्रिम विसर्जन स्थळांची संख्या १७० इतक्या मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आलेली आहे.

यामध्ये बेलापूर विभागात २२, नेरुळ विभागात २९, वाशी विभागात १६, तुर्भे विभागात २१, कोपरखैरणे विभागात १६, घणसोली विभागात १६, ऐरोली विभागात २५ व दिघा विभागात १४ गावांसह २५ अशाप्रकारे एकूण १७० कृत्रिम विसर्जन तलाव उभारण्यात आले आहेत.

याशिवाय तलावातील जलप्रदूषण रोखण्यासाठी १४ मुख्य तलावातील जलाशयाच्या साधारणतः ३० टक्के भागात नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या गॅबियन वॉलच्या विशिष्ट क्षेत्रात श्रीमूर्ती विसर्जन करावे या आवाहनासही मागील अनेक वर्षांपासून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

नैसर्गिक व कृत्रिम अशा सर्व मिळून एकूण १९२ विसर्जन स्थानांवर पुरेशा संख्येने स्वयंसेवकांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## पेणमधील शाडू मातीच्या गणरायांचे दिल्लीत महाराष्ट्र एम्पोरियममध्ये प्रदर्शन

**पेण : प्रतिनिधी**

गणेशमूर्तीकलेसाठी प्रसिद्ध असलेल्या पेणच्या शाडू मातीच्या गणेशमूर्तींनी आता दिल्लीच्या महाराष्ट्र एम्पोरियममध्येही ठसा उमटविला आहे. नगरसेविका पल्लवी प्रसाद कालेकर यांच्या संकल्पनेतून आणि भाजपा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांच्या पुढाकाराने पेणच्या मूर्ती प्रथमच विक्री व दर्शनासाठी ठेवण्यात आल्या आहेत. या प्रदर्शनाची पाहाणी करताना धैर्यशील पाटील यांनी पेणच्या मूर्तीकारांची आस्थेने विचारपूस करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पेणची पारंपारिक गणेशमूर्तीकला ही महाराष्ट्राच्या समृद्ध कला-संस्कृतीचा भिमान असून, दिल्लीच्या माध्यमातून देशभर पोहोचण्याची संधी मिळणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले



दिल्लीतील या प्रदर्शनामुळे पेणच्या मूर्तीकारांना आर्थिक संधी मिळण्यासह त्यांच्याकडे राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळवण्याच्या मदत होणार आहे.

## जखमी गाईची सुखरूप सुटका

**पाली** : पंधरा दिवसांपासून एका गाईच्या पायात प्लास्टिकची वस्तू अडकली होती, ज्यामुळे तिला मोठी दुखापत झाली होती. या गंभीर परिस्थितीत काही जागरूक नागरिक आणि प्राणीमित्रांच्या मदतीने बुधवारी (ता. ९) या गाईची सुखरूप सुटका करण्यात आली असून, तिच्यावर योग्य उपचार करण्यात आले आहेत.गाईच्या पायात प्लास्टिकची एक वस्तू घट्ट अडकली होती. अनेक दिवसांपासून ती तशीच असल्याने पायाला मोठी जखम झाल्याने गाईला चालणेही कठीण झाले होते.

पान १ वरुन


### पनवेलमध्ये दिव्यांग असेसमेंट कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

व डॉक्टर यांनी विशेष मेहनत घेतल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे आभार मानले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवरही मोठ्या संख्येने दिव्यांग बांधवांनी शिबिरात सहभाग नोंदविल्याने अशा सेवांची गरज किती मोठी आहे हे स्पष्ट होत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आगामी १७ सप्टेंबर रोजी असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत देशाच्या विकासासाठी त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, अशी प्रार्थना केली. दिव्यांग बांधवांना त्यांच्या गरजेनुसार सहाय्यक साधने उपलब्ध करून देण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. मोठ्या संख्येने लाभार्थ्यांनी सहभाग घेतला असून लवकरच त्यांना आवश्यक साहित्य वितरित करण्यात येईल, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

## भाजपा दक्षिण रायगड जिल्हा ओबीसी अध्यक्षपदी निलेश रातवडकर

**तळा : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी दक्षिण रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्षपदी ॲड. निलेश रातवडकर यांची निवड झाली आहे.त्यांच्या या निवडीने पक्षाला एक नवी दिशा मिळून पक्ष वाढीस मजबूती मिळणार आहे.व जिल्हास्तरावर ओबीसी समाजाचे संघटन मजबूत करण्याची महत्वाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर पडली आहे.




भाजपा दक्षिण रायगड ओबीसी मोर्चा रायगड जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याचे नियुक्तीपत्र माजी राज्यसभा खासदार तथा जिल्हा अध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या सहीने दिले आहे.आता रातवडकर यांची जबाबदारी वाढली असून क्षेत्र वाढला आहे.त्यात अलिबाग ,पेण ,श्रीवर्धन,महाड या चार विधानसभा मतदारसंघ व ९ तालुक्याची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली आहे.त्यांची निवड झाल्याने त्यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

## 'मुका माथम' सण उत्साहात साजरा; महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात पिठोरी आमावस्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानंतर एक किंवा दोन दिवसांनी 'मुका माथम' साजरा करण्यात येतो. हा सण झाल्यावर श्री गणेशोत्सव साजरा करण्याची खऱ्या अर्थाने लगबग सुरु होते. यंदा 'मुका माथम' पिठोरी अमावस्या नंतर दुसऱ्या दिवशी साजरा करण्यात आला. यामध्ये महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने असते.



मुका माथम साजरा करताना दिवसभर सर्वकाही मुक्यानेच करावे लागते. अगदी पहाटे रानात जाऊन मुक्यानेच कचोऱ्याची फुले आणावी लागतात. हल्ली ही फुले आदिवासी लोक बाजारपेठेत आणतात. ज्यांच्या घरी हा सण साजरा करण्यात येतो. त्यांच्या घरी तेथून सायंकाळच्या सुमारास मुक्यानेच ही फुले आणली जातात. सातच्या सुमारास पूजेला सुरुवात होते. पाटावर फुले मांडून पूजेची सुरुवात करण्यात येते. सारे काही मौन पाळून करायचे असते.

पिठोरी सारखीच ही पूजा असते. पूजा झाल्यावर हर हर महादेवाचा गजर करण्यात येतो. त्यावेळी वाळूमध्ये फुले मिक्स करून ती उडविली जातात. नंतर महा आरती होते आणि महा प्रसादाने सणाची सांगता होते. गावात एक किंवा दोन कुटुंबामध्येच हा सण साजरा करण्यात येतो. त्यामुळे सर्व गावकरी तेथे उपस्थित राहतात.

मुका माथमच्या पूजेसाठी कर्जत नगरपरिषद हद्दीतील मुद्रे मधील अण्णा बैलमारे यांच्या निवासस्थानी सदाशिव बैलमारे यांनी पूजा केली. याप्रसंगी उपगराध्यक्ष संतोष पाटील, माजी नगरसेविका संचिता पाटील, वसंत मोधळे, मारुती बैलमारे, बाळू निगडूसे, सुनील बैलमारे, संदीप पाटील, चंद्रकांत मोधळे, जगदीश बैलमारे, प्रकाश मुसळे, गणेश बैलमारे, संकेत बैलमारे आदिंसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल रेल्वेस्थानकात चाकरमान्यांची गर्दी

## गणेशोत्सवाला गावी जाण्यासाठी प्रवाशांची लगबग

.पनवेल : रामप्रहर वृत्त

लाडक्या गणरायाच्या आगमनाला अवघा एक दिवस उरला असताना कोकणातील चाकरमान्यांना बाप्पाच्या भेटीची ओढ लागली आहे. गावी जाण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात शनिवारी सकाळपासूनच प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.



आरक्षणाच्या गाड्यांची तिकिटे फुल्ल झाली असतानाही बाप्पाच्या भेटीची आस लागलेल्या चाकरमान्यांचा उत्साह मात्र कमी झालेला नाही. 'मिळेल ती रेल्वे पकडायची आणि गावी पोहोचायचे', असा निर्धार अनेक प्रवाशांनी केला आहे.

कोकणाकडे जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्या सोडण्यात आल्या असल्या तरी स्थानकावरील गर्दी कमी होताना दिसत नाही. हातात बॅगा, सोबत लहान मुले आणि कुटुंबीयांना घेऊन चाकरमानी रेल्वेची प्रतीक्षा करताना दिसत आहेत. काही प्रवासी आरक्षित तिकिटाच्या प्रतीक्षेत, तर काही मिळेल त्या गाडीने गावी जाण्याच्या तयारीत आहेत.

गणेशोत्सवासाठी वर्षभर वाट पाहणाऱ्या चाकरमान्यांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत आहे.'बाप्पा, मी येतोय... तुझ्या स्वागतासाठी!' अशी भावना प्रत्येकाच्या मनात असल्याचे भक्तिपूर्ण वातावरण पनवेल रेल्वे स्थानकात पाहायला मिळत आहे.गावी पोहोचल्यानंतर घरातील गणरायाचे स्वागत करण्यासाठी नागरिकांनी विविध साहित्यही सोबत घेतले आहे. कोकणातील घराघरांत गणरायाच्या स्वागताची तयारी सुरू असल्याने चाकरमान्यांची गावाकडे जाण्याची लगबग वाढली आहे.

रेल्वे स्थानकातील फलाटांवर प्रवाशांची गर्दी, सामानाच्या बॅगा आणि 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष असे भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मुंबई, नवी मुंबई आणि पनवेल परिसरातून हजारो चाकरमानी कोकणाच्या दिशेने रवाना होत आहेत.आरक्षण मिळाले नाही, गर्दी असली तरी बाप्पाला भेटायचेच, या भावनेने प्रवासी मिळेल त्या गाडीने गावी जाण्यासाठी प्रयत्न करत आहेत.अतिरिक्त गाड्यांची व्यवस्था असली तरी प्रवाशांची स्थानकावर मोठी गर्दी होत आहे.

## शर्मिला गावंड यांना शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार

उरण : बातमीदार

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून सातत्याने नाविन्यपूर्ण, कृतीआधारित व विद्यार्थीकेंद्रित शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या शर्मिला महेंद्र गावंड यांना रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२६-२७ चा 'शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची जिल्हास्तरावर झालेली ही दखल शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

रायगड जिल्हा परिषदेचा मानाचा शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कारमहाड येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात दिला.पालकमंत्री भरत गोगावले , विधान परिषदेचे आमदार अनिकेत तटकरे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील , जिल्हा शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे , जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा परिषदेचे सर्व समित्यांचे सभापती , जिल्हा परिषद सदस्य, शिक्षणाधिकारी, सर्व तालुक्यांचे गटशिक्षणाधिकारी, या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

शर्मिला गावंड यांनी पारंपरिक अध्यापन पद्धतीला नाविन्याची जोड देत विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता कृतीतून शिकावे, प्रयोगातून संकल्पना समजून घ्याव्यात आणि स्वतः विचार करून शिकण्याची सवय लागावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या शैक्षणिक उपक्रमांची दखल घेतली गेली आहे.

## 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' उपक्रमांतर्गत २९ सप्टेंबरला जिल्ह्यात रोजगार मेळाव्यांचे आयोजन

पनवेल : रामप्रहर वृत्त

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्य शासनाच्या वतीने 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम येत्या २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तरी जिल्ह्यातील अधिकाधिक नोकरीइच्छुक युवक-युवतींनी ऑनलाईन अर्जाद्वारे आपली अचूक प्राथमिक माहिती भरून नोंदणी करावी, असे आवाहन रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील चार मुख्य केंद्रांचा समावेश आहे. महापालिका क्षेत्रातील अंजुमन आय इस्लामचे कळसेकर टेक्निकल कॅम्पस, आयटीएम युनिव्हर्सिटी, एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस (फार्मसी) आणि रतन टाटा महाराष्ट्र राज्य स्किल युनिव्हर्सिटी या चार ठिकाणी २९ सप्टेंबर रोजी प्रत्यक्ष मेळावे पार पडतील.

पनवेल महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने या चारही केंद्रांसह क्षेत्रातील १४ औद्योगिक आस्थापनांना सहभागाबाबत तसेच नोंदणी केंद्र उभारण्याकरिता पत्रव्यवहार करण्यात आला आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त युवकांनी या संधीचा लाभ घेऊन आपली नोंदणी निश्चित करावी, असे आवाहन महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

**पनवेल महापालिका क्षेत्रातील मेळाव्याची ठिकाणे**

१. अंजुमन आय इस्लामचे कळसेकर टेक्निकल कॅम्पसः प्लॉट नं. २ व ३, सेक्टर - १६, ठाणा नाक्याजवळ, खांदागाव, नवी पनवेल.
२. आयटीएम युनिव्हर्सिटीः प्लॉट नं. २५, २६, इंडस्ट्रियल एरिया, सेक्टर - ४, खारघर.
३. एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस (फार्मसी): ३ रा मजला, एमजीएम एज्युकेशनल कॅम्पस, प्लॉट नं. १ व २, सेक्टर - ०१, कामोठे.
४. रतन टाटा महाराष्ट्र राज्य स्किल युनिव्हर्सिटीः३ रा मजला, हसमुख भवन, सिडकोच्या मागे, हिरानंदानी पार्क जवळ, सेक्टर-४, खारघर.

**नोकरी इच्छुकांसाठी नोंदणी**

'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्याराज्यव्यापी रोजगार मेळावे/ प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या युवक-युवतींनी खालील लिंकवर जाऊन आपली प्राथमिक माहिती अचूक भरावी.

## डेरवली शाळेतील विद्यार्थ्यांनी मातीला आकार देत साकारला बाप्पा

पनवेल : वार्ताहर

रायगड जिल्हा परिषदेच्या पनवेल तालुक्यातील डेरवली शाळेत 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू माती व लाल मातीपासून गणपतीच्या मूर्ती तयार करण्याचा अभिनव उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.



या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला आणि कौशल्याला वाव देत मातीला आकार देऊन सुंदर गणेशमूर्ती साकारल्या. स्वतःच्या हातांनी बाप्पाची मूर्ती घडविताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता.मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कृती कौशल्याला चालना मिळण्यासोबतच नवनिर्मितीची क्षमता विकसित झाली. तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्वही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजले.

'नवनिर्मितीतून आनंद आणि पर्यावरणातून संवर्धन' असा सुंदर संदेश या उपक्रमातून देण्यात आला. गणेशोत्सवात पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करण्याची गरजही विद्यार्थ्यांना यानिमित्ताने समजावून सांगण्यात आली.हा उपक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी भोसले तसेच शिक्षक रविंद्र रोटकर, विजेता पाटील आणि वर्षा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हा उपक्रम आनंददायी आणि संस्मरणीय केला.

## शिक्षक दिनानिमित्त कळंबोलीत 'गुरू सन्मान आरोग्य कार्ड' वाटप

पनवेल : वार्ताहर

शिक्षक दिनाचे औचित्य साधून कळंबोलीतील सुधागड शाळेच्या जुन्या इमारतीत 'गुरू सन्मान आरोग्य कार्ड वाटप सोहळा' उत्साहात पार पडला. शिवसेना पनवेल-रायगड जिल्हाप्रमुख तथा पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक रामदास वामन शेवाळे यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत शिक्षकांना आरोग्य कार्डचे वाटप करण्यात आले. तसेच सुप्रसिद्ध तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून शिक्षकांसाठी मोफत आरोग्य मार्गदर्शन आणि प्राथमिक निदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. शिक्षकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

शिक्षक हे समाजाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि जीवनमूल्यांची शिकवण देणाऱ्या गुरूजनांचा सन्मान करण्याबरोबरच त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हीदेखील समाजाची जबाबदारी आहे. याच भावनेतून शिक्षकांसाठी आरोग्य कार्ड वाटप आणि मोफत आरोग्य मार्गदर्शनाचा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाला शिक्षक तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमासाठी उपस्थित शिक्षकांनी आयोजक रामदास शेवाळे यांचे आभार मानले. समाजाला दिशा देणाऱ्या गुरुजनांची सेवा आणि सन्मान हीच खरी समाजसेवा असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.यावेळी सुधागड कॉलेजचे प्राचार्य राजेंद्र पालवे, डॉक्टर पल्लवी कदम, युवा उद्योजक ओंकार शेवाळे यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होता.

## कळंबोलीत ढोल-ताशे, टाळ मृदुंगाच्या गजरात गणरायाचे आगमन

कळंबोली : बातमीदार

प्राणप्रतिष्ठेपूर्वी गणेशोत्सवात गणरायाचे आगमन हा एक आगळावेगळा सोहळा हा सर्वत्र पाहायला मिळतो. गणरायाचे आगमन ही तितक्याच दमदार आणि डीजेच्या तालावर थीरकत गणेश भक्त हे नेहमी करत आलेले आहेत.परंतु सद्यस्थितीत डीजे बाबत पुण्यामध्ये झालेली अन उभी राहिलेली बापट चळवळ तिचा परिणामही पनवेलमध्ये जाणू लागला आहे. कळंबोली मधील गणरायाचे आगमन करण्यासाठी डीजे ऐवजी टाळ मृदुंग लेझीम ढोल पथक आणि बुलबुल वाद्याचा वापर करण्यात आला. यावेळी कळंबोली पोलीस दलाने चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.




कळंबोली वसाहतीमध्ये गणेशोत्सवा मध्ये गणरायाच्या मूर्तीचे आगमन करण्यासाठी मोठा जल्लोष आणि उत्साह निर्माण करण्याची प्रथा आहे.यामध्ये डीजेच्या वाद्य वृंदामध्ये प्रचलित नव्या गाण्याच्या ठेक्यावर गणेशभक्त आपले नृत्य सादर करीत गणराया च्या मूर्तीला मंडपापर्यंत घेऊन जात असतात. परंतु डीजे च्या आवाजाबाबत आणि वाद्याबाबत पुण्यामध्ये बापटांनी सुरू केलेली चळवळ हे निश्चितच समाजाला प्रेरणादायी अशीच ठरली आहे. बापटांनी डीजे बाबत सुरू केलेली जनजागृती त्याचे अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी स्वागत करून तसे आचरणात आणुनही दाखवूनही दिले आहे.

त्यामुळे गणेश भक्तांनी टाळ,मृदुंग, ढोल,ताशे, बुलबुल पियानो या वाद्यांचा वापर करून व त्यावर जल्लोषात नृत्य सादर करून गणरायाचे आगमन तेवढेच जल्लोषाने भक्तीपूर्ण वातावरणात करण्यात आले . नागरिकांनीही या सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या गणेश उत्सव मंडळांचेही तितकेच कौतुक केले.



**पनवेल : भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे पनवेल शहराध्यक्ष हिमेश प्रभाकर बहिरा यांनी संकलित केलेल्या विशेष आरती संग्रहाचे प्रकाशन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, प्रभाग अध्यक्ष रघुनाथ बहिरा, गौरव कानपिळे, चांगदेव बहिरा, कृपेश कानपिळे, अभिजीत भगत यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपा पनवेल शहर उपाध्यक्ष केदार सुरेश भगत यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही विशेष आरती पुस्तकाचे प्रकाशन रविवारी पनवेल येथे उत्साहात संपन्न झाले. या आरती पुस्तकाचे प्रकाशन पनवेलचे आमदार तथा भाजपा प्रदेश सचिव प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमास सुमित दसवते, ब्रिजेश बहिरा, हर्षद गडगे, सचिन जाचक, योगेश साळवी, संतोष वर्तले, भावेश शिंदे, यज्ञेश पाटील आणि मानव पालकर यांची प्रमुख उपस्थिती होती.**

## स्थानिक कुटुंबावर परप्रांतीयांचा शस्त्रास्त्रांनी हल्ला; १३ जणांना अटक



उरण : प्रतिनिधी

उरण तालुक्यातील द्रोणगिरी नोडमधील स्थानिक घरत यांच्या कुटुंबांवर घातक शस्त्रास्त्राने हल्ला करून जीवे ठार मारण्याची धमकी देऊन स्कुटीची मोडतोड केल्याप्रकरणी उरण पोलिसांनी १३ परप्रांतीयांना शुक्रवारी अटक केली आहे.

उरण- द्रोणागिरी नोड मधील सेक्टर ५० मधील निर्मला हाईटस इमारतीसमोरील रस्त्यावरून जाणाऱ्या रुपेश भोईर (३८), पत्नी रविना (३२), मुलगी रुही (७) हे रात्री स्कुटीवरून जात होते.यावेळी त्यांच्या अंगावर खाद्यपदार्थांच्या स्टॉलवरुन खरकटे फेकले. याचा जाब विचारल्याचा राग धरून काही अज्ञात परप्रांतीयांनी बेकायदेशीर जमाव जमवून घातक शस्त्रास्त्राने घरत कुटुंबियांवर हल्ला केला. घरत कुटूंबाला लोखंडी रॉडनेही मारहाण केली.जीवे ठार मारण्याचीही धमकी दिली.त्यांच्या स्कुटीचीही मोडतोड करून नुकसान केले.

या गंभीर घटनेप्रकरणी रुपेश भोईर यांनी परप्रांतीय हल्लेखोरां विरोधात उरण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारींची वरिष्ठ पोलिस निरिक्षक जगदिश शेलकर यांनीही गंभीरपणे दखल घेऊन कारवाईला सुरुवात केली होती.कारवाई दरम्यान उरण पोलिसांनी गुड्डू राणा प्रताप सिंह (२५), सचिन रणधीर सिंह (२३), संदीप विजय सिंह(३०), धर्मेंद्र यादव (२५),पदुम श्रीराज नारायण पांडे (२३), राम केवल राणा(२०), चंद्रप्रकाश दिनानाथ यादव (१९),केशरीलाल कृपाराम राणा (२५), संतोष ब्रीजलाल यादव (२६), राजेश रामदेव वर्मा (२५), ब्रिजेश रामसुरत आर्या (२५), बबलू चौहान (२६),भुरा चौहान (२५) आदी १३ परप्रांतीयांना उरण पोलिसांनी अटक केली आहे.

## रिक्षाचे भाडे दिले नाही म्हणून केली मारहाण

नवीन पनवेल : रिक्षाचे भाडे दिले नाही याचा जाब विचारला असता आरोपीने मारहाण केली. या मारहाणीत तोंडातील दात ओठाच्या आतील बाजूस घुसून चार टाके पडल्याप्रकरणी मोहम्मद जावेद मुनावर हुसेन (राहणार कुर्ला पश्चिम) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात दहा सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

गणेश नामदेव पाटील हे तळोजा मजकूर येथे राहत असून ते रिक्षा चालक आहेत. रिक्षा घेऊन पेठाली मेट्रो स्टेशन ते ओम रेसिडेन्सी सेक्टर १५ फेस १, तळोजा असा प्रवास करताना मोहम्मद मुनावर हुसेन शेख याने फिर्यादीच्या रिक्षाचे ३० रुपये भाडे दिले नाही.

या गोष्टीचा जाब विचारला असता म्हणून मोहम्मद याला राग आला आणि त्याने हाताच्या बुक्कीने गणेश पाटील यांच्या तोंडावर मारले. यावेळी तोंडातील दात ओठांच्या आतील बाजूस घुसून चार टाके पडले.

## संपादकीय

# आधी वंदू तुज मोरया...

थकलेल्या आणि गजबजलेल्या दिनक्रमातून विसावा देत, मांगल्याची आणि उत्साहाची नवी पहाट घेऊन दरवर्षीप्रमाणे यंदाही लाडक्या गणरायाचे आगमन झाले आहे. विघ्नहर्ता बाप्पाच्या या आगमनाने केवळ घरोघरीच नव्हे, तर अवघ्या महाराष्ट्राच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यात सळसळता उत्साह, सकारात्मकता आणि एकात्मतेची नवी ऊर्जा संचारली आहे.

**दरवर्षी येणारा गणेशोत्सव आपल्यासोबत केवळ धार्मिक विधी घेऊन येत नाही, तर तो आपल्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाला पुनरुज्जीवित करणारा एक चैतन्यदायी सोहळा ठरतो. आजच्या गतिमान आणि काहीशा ताणतणावाच्या युगात बाप्पाचे आगमन मानवी मनाला एक नितांत सुंदर विसावा देऊन जाते. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण, सुगंधी फुलांची आरास आणि 'गणपती बाप्पा मोरया'चा अखंड जयघोष यामुळे अवघे वातावरण भारावून जाते. हा केवळ एका देवतेचा उत्सव नसून तो मानवी मनातील नैराश्याचा अंधार दूर करून आशेचा नवा प्रकाश पसरवणारा महाउत्सव आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी ज्या उदात्त हेतूने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली, तो सामाजिक ऐक्याचा विचार आजही या उत्सवाच्या केंद्रस्थानी आहे. विविध जाती, धर्म आणि पंथांचे लोक जेव्हा बाप्पाच्या दर्शनासाठी एकत्र रांगेत उभे राहतात, तेव्हा समाजातील सर्व भेद गळून पडतात. हा उत्सव आपल्याला एकत्र आणतो, एकमेकांचे हात हातात घेऊन पुढे जाण्याची प्रेरणा देतो. आजच्या काळात जिथे समाज माध्यमांमुळे माणसे आभासी जगतात जवळ आली आहेत, पण प्रत्यक्ष जगतात दुरावत आहेत; तिथे गणेशोत्सव हा माणसांना प्रत्यक्षात जोडणारा एक भक्कम पूल ठरत आहे. सार्वजनिक मंडळांचे कार्यकर्ते, अहोरात्र कष्ट करणारे तरुण आणि एकत्र येणारे शेजारी या सर्वांमधून 'वसुधैव कुटुंबकम' ही भावना अधिक गडद होते. उत्सवाचे बदलते स्वरूप आणि त्यातील सकारात्मकता ही विशेष कौतुकास्पद आहे. गेल्या काही वर्षांत गणेशोत्सवाने 'पर्यावरणपूरक' रूप धारण केले आहे. शाडूच्या मातीच्या मूर्ती, नैसर्गिक रंगांचा वापर आणि विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची केलेली निर्मिती यामुळे आपण निसर्गाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवत आहोत. बाप्पा हा स्वतः निसर्गाचा रक्षक आहे, त्यामुळे त्याची पूजा करताना निसर्गाची हानी होणार नाही याची काळजी आजची तरुण पिढी घेत आहे. हा पर्यावरणाचा संदेश केवळ उत्सवापुरता मर्यादित न राहता तो आपल्या जीवनशैलीचा भाग बनत चालला आहे, ही एक अत्यंत सकारात्मक आणि सुखावणारी बाब आहे. या उत्सवाचे आर्थिक, व्यावसायिक पैलूही तितकेच महत्त्वाचे आहेत. गणेशोत्सवाच्या या काळामध्ये कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल होते, ज्यातून लाखो हातांना रोजगार मिळतो. मूर्तिकार, सजावट कलाकार, मंडपवाले, विद्युत रोषणाई करणारे, वादक, फुलविक्रेते या सर्वांच्या घरांमध्ये बाप्पाच्या कृपेने समृद्धी येते. हा उत्सव केवळ आनंद देत नाही, तर तळागाळातील आर्थिक व्यवस्थेला गती देणारा एक मोठा कणा ठरतो. सणांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेला मिळणारी ही चालना देशाच्या विकासात आणि सामान्यांच्या सक्षमीकरणात मोलाचा वाटा उचलते. अनेक गणेशोत्सव मंडळे आता केवळ करमणुकीचे कार्यक्रम न घेता सामाजिक भान जपणारे उपक्रम राबवत आहेत. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, अनाथालयांना मदत आणि दुष्काळग्रस्त भागांसाठी निधी गोळा करणे यांसारख्या सेवाभावी कार्यांमुळे उत्सवाचे पावित्र्य अधिकच वाढले आहे. लाडक्या बाप्पाचे आगमन झाले आहे. त्यामुळे पसरलेले चैतन्य आपल्या आयुष्यात कायम टिकून राहो, हीच या मंगलसमयी प्रार्थना!**

# गणेशोत्सव : एक वैभवी लोकोत्सव

गणेशोत्सव म्हणजे तमाम महाराष्ट्रासह संपूर्ण जगातील मराठी मनाचा एक लोकोत्सव. बुद्धीचे आराध्यदैवत असलेल्या या गणेशाच्या उत्सवाला लोकमान्यांनी १३४ वर्षांपूर्वी सार्वजनिक स्वरुप देवून लोकांचा लोकांनी केलेला लोकांसाठीचा वैभवी लोकोत्सव केला. गणेशोत्सव सार्वजनिक करण्यामागे लोकमान्य टिळकांची असलेली त्यावेळेसची भूमिका आणि तदनंतर त्यास लाभलेली वैभवशाली परंपरा खरोखरच याची महती स्पष्ट करते.

राजधानी मुंबईपासून ते थेट महाराष्ट्रातल्या कोणत्याही गाव-खेड्यात हा उत्सव भाद्रपद शुक्ल ४ म्हणजे गणेश चतुर्थी ते भाद्रपद शुक्ल १४ अनंत चर्थुदशी असा दहा दिवस साजरा केला जातो. काही ठिकाणी दीड, तीन, पाच आणि सात दिवसांचा असा कालावधी असतो. यावर्षी १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर असा बारा दिवस हा उत्सव आहे. सुखकर्ता दुखहर्ता हे दोन शब्द अथवा गणपती तू गुणपती तू या दोन शब्दामधून श्री गणेशाची महती आपल्या लक्षात येते. सुखाचा कर्ता सर्वता व दुखाचे हरण करणारा असा सर्व गुणांचा अधिपती गणपती बाप्पा. गणपती हा चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा देव. तो बुद्धीचा देव आहे. म्हणून जसं संगीताशी, नृत्याशी, तसं शब्दांशीही त्याचं सामर्थ्य अपरिहार्यपणे जोडलं गेलेलं आहे. मराठीतल्या आद्य कवींनी गणपतीला वंदन करुनच आपल्या साहित्यकृतीला प्रारंभ करावा यात नवल नाही.

### श्रीगणेश जन्मकथा

भगवान शिव व माता पार्वती यांचा पुत्र म्हणण्यापेक्षा श्रीगणेशास पार्वती पुत्र गौरी सुत, गौरीनंदना म्हटले जाते. असे म्हणतात की, शिवाचा एक गण नंदी यांने एकदा पार्वतीची आज्ञा पाळली नाही म्हणून पार्वतीने स्वतःच्या अंगावर लावलेल्या हळदीच्या उटण्यापासून एका बालकाची मूर्ती केली आणि त्यास सजीव केले. त्या बालकास आज्ञा दिली की, मी आंघोळीला जात आहे, कोणासही आत सोडू नकोस. भगवान शिव त्या दरम्यान तेथे आले. त्यांना आत जाण्यास बालकाने मज्जाव केला. एका अनोळखी बालकांने केलेली रुकावट पाहून भगवान शिव क्रोधित झाले आणि त्यांनी त्या बालकाचा शिरच्छेद केला. दरम्यान पार्वती बाहेर आल्यावर तिला घडलेला प्रकार समजला. आपल्या मुलाचा शिरच्छेद पाहून ती क्रोधीत, कोपीत झाली. पार्वती मातेचा राग शांत करण्यासाठी भगवान श्रीविष्णूने गरुडाला एखाद्या बालकाचे शिर घेऊन येण्यास उत्तरेकडे पाठविले. जी माता आपल्या बालकाकडे पाठ करून झोपलेली आहे तीच्या बालकाचे शिर गरुड शोधत होता. त्यास एक हत्तीण आपल्या छोट्या पिलाकडे पाठ करून झोपलेली दिसली. त्याने त्या हत्तीच्या पिलाचे शिर कापून आणले. आणि ते त्या बालकाच्या धडावर बसविले. त्यास जिवीत केले, अशी आहे श्रीगणेशाची जन्मकथा. हा दिवस म्हणजे भाद्रपद शुक्ल ४ म्हणून या दिवसापासून गणेशोत्सव सुरू होतो.

### आद्य लेखक

श्रीगणेशास आद्य लेखक म्हटले जाते. कारण त्यांनी महर्षी व्यासांनी जे महाभारत सांगितले ते त्यांनी लिहीले असे म्हटले जाते. महाभारतासारखे लिखाण करणारा हा आद्य लेखक म्हणजे एकदंत विनायक श्रीगणेश होय. यासंदर्भातील बऱ्याच कथा दंतकथा आहेत.

### सार्वजनिक उत्सव

श्रीगणेशाची व्यक्तिगत पातळीवर किंवा कौटूंबिक पातळीवरील पूजाअर्चा ही पूर्वापार परंपरा आहे. भाद्रपद शु|| चतुर्थीला वरदा चतुर्थी असेही म्हणतात. त्या दिवशी गणपतीची मंगलमूर्ती घरी आणून सिद्धिविनायक या नावाने दीड दिवस स्थापना करून विधिपूर्वक पूजा लोकमानसाने केली. पुढे पेशव्यांच्या कारकिर्दीत चतुर्थीपासून दशमीपर्यंत गणेशपूजा उत्साहाने पार पडू लागली. तर या पूजेला समूहाचे अधिष्ठान लोकमान्यांनी प्राप्त करून दिले. जनजागृती आणि सामाजिक ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी लोकमान्य टिळक यांनी १८९२ साली शिवजयंती व सार्वजनिक गणेशोत्सवाची स्थापना केली.त्यांनी पुण्यामध्ये पाच ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केले. या त्यांच्या कल्पनेस जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि १८९३मध्ये सार्वजनिक उत्सवाची स्थापना करण्यात आली, तेव्हा मुंबईतील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव गिरगावातील मुगभाटातील केशवजी नाईकांच्या चाळीत संपन्न झाला. मुंबईत किंवा महाराष्ट्रातही अगदी प्रारंभापासून अखंडपणे निष्ठेने, लोकमान्य टिळक यांच्यासारख्या महापुरुषाने घालून दिलेली शिकवण आजही आचरणात आणून आपल्या कुवतीप्रमाणे व शक्तीनुसार समाजप्रबोधन व संस्कृती संवर्धनाचे कार्य सेवाभावीवृत्तीने करणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या संस्था आहेत. काही संस्थांमार्फत शतकोत्तर गणेशोत्सव देखील साजरे केले जात आहेत.

स्वातंत्र्याच्या चळवळीत गणेशोत्सवाचे योगदान फार मोठे आहे, कारण टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला. त्यावेळी व्हिक्टोरियाने पत्रक काढले होते. त्याच लोकांना काही आश्वासने दिली होती. धार्मिक गोष्टीत ढवळाढवळ करणार नाही, असं तिनं म्हटल होतं. त्याचा फायदा घेऊन टिळकांनी धार्मिक कार्यक्रम म्हणून गणेशोत्सव, शिवजयंती उत्सव सुरु केला. या उत्सवात महात्मा गांधी, सुभाष बाबू, सरोजनी नायडू यांची भाषणे होत होती आणि ही भाषणे गणपती हा स्वातंत्र्य योद्धा आहे. त्याचे गुणगान करणारी म्हणून होत होती. त्यात इंग्रजांवर त्यांचा रोख असे. दुसरी गोष्ट अशी अस्पृश्यता निवारण हा मोठा भाग गणेशोत्सवाने साधला. १८९३मध्ये गणेशोत्सव झाल्यानंतर टिळकांनी जे पहिले व्याख्यान दिले त्यात असे म्हटले की, साळी, माळी, सुतार या उत्सवात सहभागी झाले, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. या सगळ्या जाती जमातींना एकत्र आणण्याचे श्रेय गणेशोत्सवाला आहे.

### काळानुरूप बदल

स्वातंत्र्यपूर्व काळात या सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरुप धार्मिक व सामाजिक अशा स्वरुपाचं होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या स्वरुपात हळूहळू बदल होत गेला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सार्वजनिक गणेशोत्सव सुरु करण्यामागचा उद्देश साध्य झालेला होता, म्हणून हा सार्वजनिक उत्सव बंद करण्याऐवजी या उत्सवाचा उपयोग सुदृढ सामाजिक निर्मितीसाठी व सामाजिक मुल्यांच्या संवर्धनासाठी करुन या माध्यमाचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न अलीकडच्या काळातील कार्यकर्त्यांनी केला. कीर्तन, प्रवचन याचे सातत्य सतत राखले गेले. मान्यवर वयांची विविध विषयांवरील व्याख्याने आयोजित करण्यात आली आणि त्यांच्या जोडीला चक्री व्याख्याने अभिरुप न्यायालय, अभिरुप लोकसभा व विधानसभा अशा तऱ्हेच्या नाविन्यपूर्ण व उद्‌बोधक कार्यक्रमांची या उत्सवात सातत्याने भर पडली. चांगल्या अभिरुचीच्या करमणुकीसाठी गायन, नाटके, नकला अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्थानिक मुला मुलींना व तरुणांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी स्थानिक करमणुकीचे कार्यक्रम आणि बौद्धिक, शारीरिक कौशल्यास वाव देणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत होते.

### 'एक गाव एक गणपती'

राज्यात दरवर्षी साधारणतः घरगुती, सार्वजनिक अशा २८ ते ३० लाख गणपतींची प्रतिष्ठापना होते. गावागावात आणि प्रभागात दिवसेंदिवस सार्वजनिक मंडळाच्या फलकांची संख्या जशी झापटय़ाने वाढत आहे, तशीच सार्वजनिक गणपतींची संख्याही वाढत आहे. महाराष्ट्रात घरगुती, सार्वजनिक गणपतींबरोबरच 'एक गाव एक गणपती'च्या संख्येतही झपाट्याने वाढ होताना दिसते. ग्रामीण भागातील सर्वार्थाने उपयुक्त असा 'एक गाव एक गणपती'चा उपक्रम आता लक्षवेधी ठरू लागला आहे. या संकल्पनेमुळे गावाचा एकोपा वाढत असून त्याचा परिणाम गावपातळीवर दैनंदिन कामकाजावर दिसून येतो.

### पर्यावरण पूरकता आणि डीजे मुक्तता

मुंबईतील गणपती केवळ उंचीसाठीच नव्हे, तर मूर्तीचे रूप, आकर्षक सजावट आणि देखाव्यांसाठीही प्रसिद्ध आहेत. विविध देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यात अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुढाकार घेतात. पूर्वी पीओपी म्हणजे प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या भव्यदिव्य अशा मूर्ती असत. अलिकडच्या काळात पर्यावरणाचा विचार करता मातीच्या व शाडूच्या मूर्तींचा आग्रह मोठ्या प्रमाणात होत आहे. ही बाब निश्‍चितच स्वागतार्ह आहे तसेच समाज एकत्र यावा या उद्देशाने सुरू केलेल्या गणेशोत्सवात महिलांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. अनेक ठिकाणी महिला मंडळे अस्थित्वात अली आहेत. महानगरात तर तरुणींचे 'ढोल पथक' निर्माण झाली आहेत. मोठ्या उत्साहात आणि जोशात ही पथक गणेश विसर्जन मिरवणुकीत दिसतात. मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर या शहरात महिलांचे प्रमाण अधिक दिसून येते. यंदा जगणे स्वच्छ वाट डीजे मुक्तता हा प्रमुख मुद्दा पुढे आलेला आहे. पाहूयात त्यास कितपत प्रतिसाद मिळतो ते.

### महाराष्ट्रातील अष्टविनायक

महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात गणेशमूर्ती तयार करण्याचे भरपूर कारखाने असून लहान मोठ्या अशा लाखो मूर्ती तयार होतात आणि देश विदेशात त्या उत्सवासाठी पाठविल्या जातात तसेच महाराष्ट्रात मोरगाव मोरेश्‍वर, थेऊर चिंतामणी, लेण्याद्री गिरीजात्मक, ओझर विघ्नेश्‍वर, रांजणगाव महागणपती, महड वरदविनायक, सिध्दटेक सिध्दीविनायक, पाली बल्लाळेश्‍वर, असे आठ ठिकाण अष्टविनायक म्हणून प्रसिद्ध आहेत. या अष्टविनायकास गणेशभक्त मोठ्या भावभक्तीने भेटी देतात.

साधारणतः १३४ वर्षापूर्वी सार्वजनिक स्वरूप प्राप्त झालेला हा भारतीय गणेशोत्सव आता भारताच्या गौरवशाली उत्सवाची परंपरा म्हणून साकारत आहे.

**-डॉ. राजू पाटोदकर,** नवी मुंबई



## बदलते तंत्रज्ञान

# कौटुंबिक फोटो अपलोड करण्यापूर्वी सावधान!

सोशल मीडियावर सध्या जुन्या आठवणींना उजाळा देणारा आणि युझर्सना १९८०च्या दशकातील विंटेज लूकमध्ये दाखवणारा '८०s ट्रेंड' लोकप्रिय ठरत आहे. सर्वसामान्य नागरिकांपासून ते नामांकित व्यक्तींपर्यंत सर्वच जण आपले फोटो वेगवेगळ्या अ‍ॅप्सच्या माध्यमातून एडिट करून सोशल मीडियावरुन पोस्ट करत आहेत, पण या ट्रेंडच्या मोहात पडून आपले आणि कुटुंबीयांचे वैयक्तिक फोटो अनोळखी थर्ड-पार्टी अ‍ॅप्सवर अपलोड करणे धोकादायक ठरू शकते, असा इशारा सायबर तज्ज्ञ अ‍ॅड. चैतन्य भंडारी यांनी दिला आहे.



सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर सध्या १९८०च्या दशकातील 'रेट्रो'फोटोंचा नवा व्हिज्युअल ट्रेंड प्रचंड व्हायरल होत आहे. फक्त साधा फिल्टर वापरण्याऐवजी, युजर्स आपले फोटो एआय टूल चॅटजीपीटीमध्ये अपलोड करून ८०च्या दशकातील क्लासिक अ‍ॅनालॉग कॅमेरा लूक तयार करत आहेत. इन्स्टाग्राम स्टोरीजवर 'Add Yours' स्टिकरच्या माध्यमातून युजर्स हे फोटो आणि प्रॉम्प्ट्स एकमेकांसोबत शेअर करत आहेत. "जर ४० वर्षांपूर्वी माझा फोटो काढला असता, तर मी कसा दिसलो असतो?" या कल्पनेतून हा ट्रेंड वेगाने लोकप्रिय होत आहे.

या ट्रेंडच्या तांत्रिक बाजूवर अ‍ॅड. चैतन्य भंडारी यांनी माहिती दिली. "जेव्हा एखादा युझर फोटो एडिट करण्यासाठी एखाद्या थर्ड-पार्टी अ‍ॅपवर फोटो अपलोड करतो, तेव्हा संबंधित कंपनीकडे फक्त एक सामान्य जात नाही. त्यासोबतच चेहऱ्याची ठेवण, बारकावे, हावभाव आणि इतर संवेदनशील बायोमेट्रिक माहितीही त्या अ‍ॅप्लिकेशनच्या सर्व्हरवर साठवली जाते." भविष्यात या डेटाचा गैरवापर करून डीपफेक, ओळख चोरी किंवा सायबर फसवणुकीसारखे गंभीर गुन्हे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यामध्ये अनेकदा युझर्स घाईगडबडीत अ‍ॅप वापरताना 'प्रायव्हसी पॉलिसी' आणि 'टर्म्स अ‍ॅंड कंडिशन्स' न वाचताच सर्व परवानग्या देऊन टाकतात. त्यामुळे सोशल मीडियावरील कोणत्याही तात्पुरत्या ट्रेंडच्या आहारी जाऊन आपले वैयक्तिक किंवा कुटुंबातील सदस्यांचे फोटो कोणत्याही अनोळखी अ‍ॅपवर अपलोड करू नका. संबंधित अ‍ॅप डेटा कसा साठवणार आहे आणि त्याचा वापर कशासाठी करणार आहे, हे तपासल्याशिवाय कोणतीही कृती करू नये, असे आवाहन सायबर तज्ज्ञांनी केले आहे.

# कुस्तीगीर-प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार

हरिश्चंद्र माधव बिराजदार हे पहिलवानी कुस्ती खेळणारे मराठी कुस्तीगीर व कुस्ती-प्रशिक्षक होते. त्यांचा आज स्मृतिदिन. स्कॉटलंड येथे झालेल्या इ.स. १९७० सालातल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये त्यांनी सुवर्णपदक पटकावले होते, तर इ.स. १९७२ साली त्यांनी भारतातील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत अजिंक्यपद जिंकून रुस्तम-ए-हिंद किताब मिळवला होता. खेळाडू म्हणून कारकिर्द संपल्यावर ते कुस्ती-प्रशिक्षक म्हणून काम करत होते. पुण्यातील गोकुळ वस्ताद तालमीत ते कुस्ती शिकवत असत.

५ जून १९५० रोजी महाराष्ट्राच्या वर्तमान लातूर जिल्ह्यातल्या निलंगा तालुक्यात रामलिंग मुदगड या गावी हरिश्चंद्र बिराजदारांचा जन्म झाला. त्यांचे वडील पहिलवान होते. हरिश्चंद्रांच्या वयाच्या पाचव्या वर्षी त्यांची आई निवर्तली. वडिलांनी कुस्ती खेळण्यातले हरिश्चंद्रांच्या अंगचे गुण हेरून त्यांना सन १९६५च्या सुमारास तालीम करण्यासाठी कोल्हापुरास गंगावेस तालमीत धाडले. १९६८च्या हिंद केसरी स्पर्धेत रौप्यपदक मिळाले, तर १९६९मध्ये दादू चौगुले याला हरवत त्यांनी महाराष्ट्र केसरी किताब पटकावला. त्याच वर्षी कानपूर येथे झालेल्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत त्यांनी हिंदकेसरी किताबही जिंकला.




## निमित्त

बिराजदार यांनी १९७०मध्ये एडमंटन, कॅनडा येथे झालेल्या जागतिक कुस्ती स्पर्धेत सहभाग घेतला होता. याच वर्षी स्कॉटलंडातील एडिंबरा येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये त्यांनी कुस्तीतले सुवर्णपदक जिंकले. याच वर्षी कॅनडा एडमंटन येथे झालेल्या जागतिक कुस्ती स्पर्धेत सहभाग घेतला. १९७२मध्ये त्यांनी म्यूनिच येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत सहभाग घेतला. याच वर्षी वाराणसी येथे झालेल्या भारतातल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत त्यांनी नेत्रपाल नावाच्या दिल्लीच्या कुस्तीगिराला हरवत रुस्तम-ए-हिंद किताब पटकावला. १९७३मध्ये मुंबईत झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले.

१९७७ साली बेळगाव येथे झालेल्या मैदानी कुस्तीच्या मुकाबल्यात बिराजदार यांनी दिल्लीच्या बिर्ला आखाड्याच्या मल्ल सतपाल सिंग याला हरवण्याचे आव्हान जिंकले. सत्तरच्या दशकात सतपालचा भारतीय कुस्तीच्या आखाड्यात मोठा दबदबा होता. जवळपास १०० किलो वजन आणि सव्वा सहा फूट उंची असलेला सतपाल अनेक मोठ्या मल्लांना पराभूत करत होता. तरीही महाराष्ट्राच्या मल्लाचा मान जपण्यासाठी बिराजदार मामांनी हे आव्हान स्वीकारले. दोघांच्या वजनात जवळपास २० किलोचा फरक होता. त्या दिवशी बिराजदार मामांनी केवळ सतपालचा पराभव केला नाही, तर महाराष्ट्राच्या कुस्तीची ताकदही दाखवून दिली. त्यामुळे ही कुस्ती आजही महाराष्ट्राच्या कुस्तीच्या इतिहासातील गाजलेल्या लढतींपैकी एक म्हणून सांगितली जाते.

खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यावर बिराजदार कुस्ती-प्रशिक्षक म्हणून काम करत होते. पुण्यातील गोकुळ वस्ताद तालमीत ते कुस्ती शिकवत असत. त्यांनी अनेक मान-सन्मान मिळवले. २००६मध्ये मेजर ध्यानचंद पुरस्कार, १९७१ साली शिवछत्रपती पुरस्कार, १९९८-९९मध्ये दादोजी कोंडदेव पुरस्कार, २००० साली राष्ट्रीय विशेष पुरस्कार, ११९४मध्ये जागतिक मराठी परिषद यांचा समावेश आहे. अशा या नामवंत कुस्तीपटूचे १४ सप्टेंबर २०११ रोजी निधन झाले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तारुण्यातच हृदय होतेय कमजोर; विकार वाढले

एकेकाळी हृदयाचा आजार केवळ वृद्धांना व्हायचा, परंतु अलिकडील आपले रहाणीमान बदल्याने वाढता ताण-तणाव, बैठी कामाची शैली यामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्याने ऐन तारुण्यात हृदयविकाराचे आजार होऊ लागले आहेत.

तिशीतच का बायपास सर्जरीची वेळ का येत आहे. यापूर्वी ५० वा ६० या वयात बायपास सर्जरीची व्हायची आता तिशीतच ही वेळ येत असल्याने जर विमा नसेल तर कुटुंबच आर्थिक संकटात सापडत आहे.



हृदयाला रक्त पुरविणाऱ्या रक्त पुरविणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज तयार झाल्यानंतर बायपास सर्जरीचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात असतो. हार्ट अटॅक आल्यानंतर किंवा हार्ट अ‍ॅटॅकच्या धोक्यापासून वाचण्यासाठी डॉक्टर बाय पास सर्जरीचा सल्ला देतात. हार्टमधील नसांमध्ये ब्लॉकेज कोलेस्ट्रॉलमुळेदेखील होत असतो तसेच रक्ताची गुठली झाल्याने देखील हृदयाचा रक्तपुरवठा बंद पडू शकतो. त्यामुळे बायपास सर्जरीचे प्रमाण खूपच वाढले आहे.

जेवणाच्या वाईट सवयी आणि बिघडलेली जीवनशैली यामुळे देखील हृदयासंबंधित आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे राजीव गांधी हॉस्पिटलचे कार्डीओजी विभागाचे डॉ.अजित कुमार यांनी म्हटले आहे. बदलती जीवन शैली, व्यायामाचा अभाव आणि धूम्रपान आणि दारूचे व्यसन यामुळे हृदय विकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे अलिकडे तिशीत हार्ट अ‍ॅटॅक येण्याचे प्रमाण खूपच वाढल्याचे गुरुग्राम येथील नारायणा हॉस्पिटलचे प्रोग्रॅम हेड कार्डियक सायन्सेसचे डॉ. हेमंत मदान यांनी म्हटले आहे.

मानसिक तणाव, अपुरी झोप याचादेखील हृदयावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे हृदयविकाराचे प्रमाण वाढले आहे. हार्टच्या आजाराविषयी लोकांमध्ये जागरुकता नाही. छातीत दुखू लागल्यावर अचानक धाप लागण्याच्या तक्रारीकडे लोक दुर्लक्ष करतात. लोकांना गॅसेस किंवा एसिडीटीचा त्रास वाटतो. परंतू याकडे दुलर्क्ष करू नये असे दिल्लीच्या आरएमएल हॉस्पिटलमध्ये कार्डिओलॉजी विभागातील प्रोफेसर डॉ. तरुण कुमार यांनी म्हटले आहे.

कमी वयात हार्ट अटॅक येण्याची कारणासाठी ब्लड प्रेशर देखील जबाबदार आहे. जामा जर्नलच्या साल २०२१मधील एक संशोधनात म्हटले आहे की, भारतात चारपैकी एका व्यक्तीला ब्लड प्रेशरच्या आजाराने ग्रस्त आहे. यातील ३० टक्के लोक कमी वयाचे आहेत.

# पेण व सुधागड तालुक्यांत गणेशोत्सवात डीजेऐवजी निनादणार टाळ-मृदुंगाचा आवाज



पेण : प्रतिनिधी

संतांच्या पावण भुमीत वारकरी समुदयासाठी एक अभिनव उपक्रम रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातुन जिल्हा परिषद अध्यक्ष व आम्ही सर्व सभापती यांनी मिळून केला आहे. प्रत्येक गावामध्ये भजनी साहित्य मंडळांना साहित्य वाटप करण्याचे काम केले आहे. ४ ते ५ वर्षे प्रशासनाचा कालावधी होता हा कालावधि संपल्यानंतर खऱ्या अर्थाने लोकहीचा व लोकशाहीच्या प्रतिनिधींचा कालावधी आलेला आहे टाळ मृदूंगाचा गजर वाजताना दिसणार आहे.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून २.५ कोटींची तरतुद या ठिकाणी केलेली आहे. व रायगड जिल्हयामध्ये १२ तर पेण तालुक्यात १४० भजनी मंडळांना साहित्य दिले आहे. हे साहित्य देत असताना खऱ्या अर्थाने सर्व सामान्य कष्टकरी वारकरी समुदायाला याचा लाभ मिळणार आहे. अधुनिक कालात डिजे वर बंदि येत आहे आपल्या जुण्या व पुराण कालातील भजनी मंडळांचा गजर वाजला पाहिजे. याचा उपयोग पेण तालुका वसुधागड तालुक्याला मिळेल असा विश्वास ही त्यांना व्यक्त केला .

आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की आजच्या आधुनिक आणि संगणकाच्या युगातही भजनाची गोडी कायम आहे, ही आपल्या संस्कृतीची ताकद आहे. भजन आणि डीजे यांची तुलना केली तर भजनातून मिळणारी आध्यात्मिक अनुभूती आणि संस्कार याला कशाचीच सर येऊ शकत नाही. त्यामुळे भजन, कीर्तन आणि वारकरी परंपरेला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. शासनानेही ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी डीजेवर निर्बंध आणले असून, भजन परंपरेला प्रोत्साहन देणारा जिल्हा परिषदेचा हा उपक्रम निश्चितच अभिनंदनीय आहे.”

वारकरी संप्रदाय हा केवळ भक्तीचा मार्ग नसून समाजप्रबोधनाची चळवळ आहे, असे सांगताना त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांसारख्या संतांनी समाजाला दिलेल्या समतेच्या आणि माणुसकीच्या विचारांचा गौरव केला.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी अध्यक्ष निलीमा पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले, सदर कार्यक्रमास पेण पंचायत समिती सभापती स्मिता पाटील सुधागड पंचायत समिती सभापती जागृती मानकर उपसभापती, पंचायत समिती सुधागड संदेश शेवाळे पेण पंचायत समिती उपसभापती संजय डंगर झेडपी सदस्य प्रभाकर म्हात्रे जनार्दन भस्मा सदस्या ताई जोमा दरवडा पेण पंचायत समिती गटविकास अधिकारी गजानन लेंडी पालीच्या बिडिओ लता मोहिते पेण कृउबा समिती सभापती हरिश्चंद्र पाटील खरेदी विक्री संघाचे चेअरमन बापू दळवी पं.स. सदस्य विवेक म्हात्रे सुशांत खाकर प्रदीप म्हात्रे मेघा पाटील कमळ पवार अस्मिता पाटील पेण पंचायत समिती प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी ग्रामसेवक आणि भजन मंडळांचे गायक बुवा व साथकरी यांनी सभागृह तुडूंब भरले होते.



पेण : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पेण शहरातील भोगावती नदीवरील गणपती विसर्जन घाटाच्या सुरू असलेल्या कामाला नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांनी आज भेट देऊन पाहणी केली.

## मुंबई-गोवा महामार्गावर यंदाही वाहतूक कोंडी कायम



महाड : प्रतिनिधी

गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी लाखो कोकणकर कोकणात दाखल होत आहेत. मात्र या कोकणवासियांना मुंबई गोवा महामार्गावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. सालाबादप्रमाणे महामार्गावरील नियोजन फुसकं ठरले आहे. यामुळे जागोजागी वाहतूक कोंडी होत आहे.

कोकणात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या गणेशोत्सवासाठी मुंबई, सुरत, बडोदा, ठाणे, पुणे, नाशिक आदी ठिकाणी वास्तव्यास असलेले कोकण कर गणेशभक्त आपल्या गावात दाखल होतात. यासाठी एस.टी. बसेस, रेल्वे, सहा महिन्यापूर्वीच आरक्षित झाल्या आहेत. त्यातच जादा बसेस, सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांकडून दिल्या जाणाऱ्या खाजगी बसेस आणि स्वतःची खाजगी वाहने यांचा देखील समावेश असतो.

मुंबई गोवा महामार्ग यापूर्वी दुपदरी होता. त्यामुळे कायम वाहतूक कोंडी आणि अपघात होत होते. शासनाने या महामार्गाचे चौपदरीकरण काम हातात घेतले आणि लवकरच वाहतूक कोंडी आणि अपघाताची समस्या कायम सुटेल अशी अपेक्षा कोकण वासियांना होती. मात्र हि समस्या आजही कायम असल्याने गणेशभक्तांमध्ये नाराजी आहे. गेली दशकानंतर देखील महामार्ग पूर्ण होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मुंबई गोवा महामार्गाचे काम आजही अपूर्ण आहे. शिवाय या महामार्गाच्या गुणवत्तेवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. नागोठणे, इंदापूर, माणगाव, याठिकाणी अद्याप काम बाकीच आहे शिवाय जागोजागी कामासाठी खोदकाम सुरुच आहे. महामार्गाचा असमतोलपणा आणि अपूर्ण कामे यामुळे महामार्गावरील प्रवास आजदेखील धोकादायकच आहे.

दोन दिवसांपासून मुंबई गोवा महामार्गावर नागोठणे, इंदापूर, माणगाव याठिकाणी आठ ते दहा किमी पर्यंत वाहनाच्या रांगा लागल्या आहेत. या वाहतूक कोंडीचा कोकणात येणाऱ्यांना मोठा त्रास होत आहे. गेली महिनाभर पोलीस प्रशासन आणि महामार्ग विभागाकडून तयारी सुरु आहे. मात्र हे नियोजन फुसकं ठरले असल्याने यावेळी देखील वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागले आहे. इंदापूर ते माणगाव दरम्यान महामार्गावर मध्यवर्ती भागात दुभाजक टाकणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने ओव्हरटेक करणाऱ्या वाहन चालकांकडून अशा प्रकारची होणारी वाहतूक कोंडी दुभाजकामुळे टाळता येणे शक्य आहे अशी सूचना स्थानिक नागरिक करत आहेत.

मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण केल्याचा दावा शासन करत असले तरी चौपदरीकरण झाल्यानंतर देखील मुंबई गोवा महामार्गावर ऐन गणेशोत्सव काळात अवजड वाहनांना बंदी केली जात आहे. यामुळे अवजड वाहनांच्या चालकांचे देखील गणेशोत्सव काळात महामार्गावर हाल होताना दिसतात. या चालकांना शासनाकडून कोणत्याच प्रकारची सुविधा उपलब्ध करून दिली जात नाही. चौपदरीकरण झाल्यानंतर तरी अवजड वाहनांची ही परवड थांबेल अशी अपेक्षा होती मात्र ती देखील फोल ठरली आहे.

## माथेरानमध्ये होऊ शकतो पाइपद्वारे गॅस पुरवठा

माथेरान : बातमीदार

माथेरानला पाइपलाइनद्वारे गॅस पुरवठा करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत.महानगर गॅसच्या अधिकाऱ्यांकडून नुकतीच यासंदर्भात पाहणी करण्यात आली.महानगर गॅस लिमिटेड कंपनीचे इंजिनीअर्स,प्लॅनिंग आणि मार्केटिंग विभागातील अधिकाऱ्यांनी माथेरानला भेट दिली. माथेरानचा घाटरस्ता, दस्तुरी नाका आणि इंदिरानगर परिसराची पाहणी केल्यानंतर माथेरानमध्ये पाइपद्वारे गॅस पुरवठा प्रकल्प राबविणे शक्य होऊ शकेल, असा प्राथमिक अंदाज प्रकल्प अधिकारी जोबीन जॉन्सन, चेतन सुवर्णा आणि साईराज मोरे यांनी व्यक्त केला.

पाइपद्वारे माथेरान येथे गॅस पुरवठा करण्याची मागणी नगरसेवक सुनील शिंदे सातत्याने करीत आहेत. या पार्श्वभूमीवर महानगर गॅसच्या अधिकाऱ्यांनी माथेरानला भेट दिली. माथेरान हे महाराष्ट्रातील लोकप्रिय पर्यटनस्थळ असून, येथे दरवर्षी दहा ते बारा लाख पर्यटक भेट देतात.ब्रिटिशकालापासून येथे वाहनांना बंदी असल्यामुळे गॅस सिलिंडरची वाहतूक घोड्यांवरून केली जाते.त्यामुळे गॅसचा पुरवठा वेळेत होत नाही. तसेच वाहतूक खर्चापोटी अतिरिक्त दीडशे ते दोनशे रुपये द्यावे लागतात. त्यामुळे माथेरानमध्ये पाइपलाइनद्वारे गॅस पुरवठा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

आखातीयुद्धाच्या परिस्थितीमुळे शहरात सिलिंडरची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाली आहे.त्यामुळे विशेषतः हॉटेलचालकांना व्यवसाय करणे कठीण होत आहे. पाइपद्वारे गॅस स्वस्त असून, त्याचा अखंडित पुरवठा केला जातो. पाइपलाइनद्वारे गॅस पुरवठा सुरू झाल्यास ही समस्या कायमस्वरूपी सुटू शकेल,असा विश्वास नगरसेवक सुनील शिंदे यांनी व्यक्त केला.महानगर गॅस कंपनीकडून गॅस सिलिंडर ट्रकमधून दस्तुरी नाका येथे आणले जातील आणि तेथून पाइपद्वारे संपूर्ण गावात गॅसचा पुरवठा केला जाईल. ज्या पद्धतीने ऑफलाइन सीएनजी पंप चालतात, त्याच धर्तीवर हा प्रकल्प राबविण्यात येऊ शकेल असा विश्वास यावेळी महानगर गॅसच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

महानगर गॅसच्या अधिकाऱ्यांनी अधीक्षक कार्यालयात तहसीलदार सुरेंद्रसिंग ठाकूर, माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे तसेच नगरसेवक मनोज खेडकर आणि केतन रामाणे यांची भेट घेतली. राहुल इंगळे यांनी पाइपलाइन गॅस प्रकल्पाचा अहवाल नगरपरिषदेला सादर करण्यास सांगितले आहे.नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत सदस्यांना प्रकल्पाबाबत माहिती दिली जाणार आहे.माथेरानच्या भविष्याच्या दृष्टीने हा पाइपद्वारे गॅस पुरवठा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे.



## कर्जत तालुक्यात खड्डे भरण्याच्या कामाला वेग

कर्जत : प्रतिनिधी

पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली भारत संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते रमेश कदम यांच्या उपोषणाला यश मिळाले आहे. कर्जत तालुक्यातील सर्व बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरण्यास सुरुवात असून रमेश कदम यांचे जलसमाधी आंदोलन तात्पुरते स्थगित झाले आहे.

कर्जत तालुक्यातील अनेक रस्ते खड्डेमय झाल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. या खड्ड्यांमुळे आतापर्यंत चार निष्पाप वाहनचालक आणि वाटसरू यांना आपला जीव गमवावा लागला आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते रमेश कदम यांनी सात सप्टेंबर पासून गणपती बाप्पाला मांडीवर घेऊन रस्त्यावर बसून उपोषणाचा मार्ग अवलंबला होता. त्यांच्या या आंदोलनाची दखल घेत अखेर प्रशासनाला जाग आली आहे.आठ सप्टेंबर पासून तालुक्यातील सर्व बांधकाम विभागाने अनेक रस्त्यांचे खड्डे बुजवण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यानंतर काल १० सप्टेंबर रोजी रमेश कदम यांनी उल्हास नदी पात्रात बाप्पाला घेऊन जलसमाधी घेण्याचा इशारा दिला होता. यानंतर कर्जतचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी तातडीने



मध्यस्थी करीत शासकीय यंत्रणा यांना खड्डे भरण्यासाठी प्रोत्साहन दिले.

तहसीलदार जाधव यांनी एम.एस.आर.डी.सी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि ग्रामपंचायत या सर्व अधिकाऱ्यांशी संपर्क केला. तालुक्यातील रस्ते तात्काळ खड्डेमुक्त करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर सर्व बांधकाम विभागाने उपोषण ठिकाणी भेट देऊन उपोषणकर्त्यांना लेखी आश्वासन दिले त्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले. उपोषण स्थगित केल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते गट विकास अधिकारी सुशांत पाटील यांच्या समवेत नेरळ ग्रामपंचायत मध्ये जाऊन तेथील प्रशासक सुजित धनगर ग्रामसेवक अरुण कार्ले यांच्या समवेत नेरळ ग्रामपंचायत मधील रस्त्याचे भरलेल्या खड्डयांची पाहणी केली. कर्जत तहसीलदारांच्या या हस्तक्षेपानंतर प्रशासन कामाला गती मिळाली आहे.

## नारंगीच्या जि.प.शाळेच्या समृद्धीची राष्ट्रीय स्तरावर निवड

चौक : प्रतिनिधी

टाइम्स ऑफ इंडिया पुरस्कृत क्रिटिकल थिंकिंग स्पर्धेत खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा, नारंगी येथील इयत्ता पाचवीतील आदिवासी समाजातील कु. समृद्धी निवृत्ती पवार हिने नेत्रदीपक कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपली निवड निश्चित केली आहे. या यशामुळे नारंगी शाळेसह खालापूर तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

रायगड जिल्हा परिषद शाळा नारंगी येथे इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी सदर स्पर्धेची परीक्षा घेण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या दुसऱ्या फेरीत कु. समृद्धी पवार हिने उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. विशेष म्हणजे समृद्धी ही आदिवासी समाजातील विद्यार्थिनी असून, तिच्या या उल्लेखनीय यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.समृद्धी पवार हिच्या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाटील तसेच भागिनाथ पोटे, दीपक खाडे आणि नम्रता यादव या शिक्षकवृंदाचे विशेष मार्गदर्शन व अथक परिश्रम लाभले.

येत्या १६ सप्टेंबर रोजी समृद्धीचे पथक दिल्लीसाठी प्रस्थान करणार असून, नवी दिल्ली येथील प्रधानमंत्री संग्रहालयात १८ व १९ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीची चाचणी घेण्यात येणार आहे. याच वेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार समारंभही आयोजित करण्यात आला आहे.




### जाहीर नोटीस

सर्व लोकांस नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिल यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत मौजे रिस, तालुकाः खालापुर, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती वंदना विष्णू म्हात्रे श्री. संदिप विष्णू म्हात्रे श्री. समिर विष्णू म्हात्रे यांच्या कडुन विकसीत करण्याकरीत घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे रिस, तालुकाः खालापुर, जि. रायगड.**

| अ.क्र. | मालकाचे नाव | सर्व्हे.नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती वंदना विष्णू म्हात्रे<br>श्री. संदिप विष्णू म्हात्रे<br>श्री. समिर विष्णू म्हात्रे | १२८ | ३/अ/३ | ०.०३.२० | ३२.०० |

सदर मिळकती वर आगर तिच्या कोणत्याही भागावर इतर कोणाला हक्क हितसंबध व तारण, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, मत्युपत्राकीतदान साठेकरार वहीवाट दावा कोणाचाही कसलाही हक्क हित संबंध मालकीदान, बोजा जाणे येण्याचा मार्ग वगैरे असल्यास त्यांनी योग्य त्या कागदीपत्राच्या पुराव्यासह नोटीस प्रसिदध झाल्यापासुन (८) आठ दिवसाच्या आत खालीसही करणार त्यांच्या पत्यावर पुराव्यासह आपली हरकत नोंदवावी. या नंतर येणा-या तक्रारी अगर हरकती आमचे अशीलावर कोणत्याही कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही हे सर्व लोकांस कळावे.

**ठिकाण : मोहोपाडा**
**दिनांक : १२.०९.२०२६**

**सही/-**
**ॲड. योगेश अरूण मानकवले**
**मु. नविन पोसरी पो. मोहोपाडा**
**ता. खालापूर जि. रायगड**
**पिनकोड ४१०२२२**
**मो.९८३३१३०९४५**

**सही/-**
**ॲड. जितेंद्र धर्मराज जाधव**
**मु. कराडेबुद्रुक, पो. गुळसुंदे,**
**ता. पनवेल, जि. रायगड.**
**पिनकोड : ४१०२०७**
**मो.९८६०८७६१४७**

### TENDER NOTICE

Sealed Tenders/Offers are invited by **Jiwan Sagar Co-operative Housing Society Ltd, SukhSagar Co-operative Housing Society Ltd, Raigad Co-operative Housing Society Limited, Indrayani Co-operative Housing Society Ltd, Prerna Co-operative Housing Society Limited,** Plot No.04,05,06,08 and 09, Sector-17, New Panvel (East)-410206, having aggregated Plot Area 12662.78 Sqmt & 372 flats/members for proposed Cluster Redevelopment in lieu of rights to sell the additional Flats from Builders / Developers of repute. The Tender Document can be collected from the PMC Office. Urban Analysis & solutions Consultancy Services, Shop No.26-27, Arenja Tower, Plot No.49 to 51, Sector 11, CBD Belapur (Contact name & Mobile no. – **Ar. Neha Raut – 8803228888)** from Date. **14.09.2026 To 30.09.2026** (Both dates included) between 11.00 am to 5.00 pm on payment of Rs 1,00,000/- (Non-Refundable) by Demand Draft in favour of Urban Analysis & Solutions Consultancy Services. Sealed Tender Bids shall be submitted in the manner as prescribed in the instructions to tenderers as mentioned in Tender Document on and before date **07.10.2026** by 5.00 pm in the PMC Office.

The Society reserves right to reject any or all bids without assigning any reason.

**Date : 14/09/2026**
Place: New Panvel,
Navi Mumbai

**sd/-**
**For, Jiwan Sagar, SukhSagar, Raigad, Indrayani, Prerna Co-operative Housing Society Limited.**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. २० (ई-निविदा) सन २०२६-२७**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप-** या निविदेमध्ये एकूण ०३ कामे समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १५.०९.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक २२.०९.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/----**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक :- १४/०९/२०२६**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

# नवी मुंबईत सुगंधी शहर अभियान अंतर्गत अंगण दत्तक योजना

## मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते शुभारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक जागेला पालकत्व देणे आणि त्या जागेची जबाबदारी स्वीकारणे या मूलभूत संकल्पेनेवर आधारीत सुगंधी शहर अभियान अंतर्गत अंगण दत्तक योजना २०२६चा शुभारंभ वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले.

वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात उत्साहपूर्ण वातावरणात समारंभ झाला. यावेळी अंगण दत्तक योजनेअंतर्गत पुढाकार घेणाऱ्या विविध क्षेत्रांतील अंगण दत्तक पालकांचा सन्मानपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना मंत्री गणेश नाईक म्हणाले की, देशाच्या पंतप्रधानांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियान स्पर्धेत नवी मुंबई सातत्याने देशात नंबर तीन व राज्यात नंबर एक क्रमांक मिळवत आहे. स्वच्छतेला सुगंधाची जोड देणारी संकल्पना उपमहापौर दशरथ भगत यांनी आणली. त्यामुळे लवकरच नवी मुंबई देशात नंबर एक असेल. अंगण दत्तक घेऊन स्वच्छतेबाबत पालकत्व स्वीकारून अनेक नागरिक, संस्था यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून या संकल्पनेला जनसहभाग चळवळ बनवली आहे. ही संकल्पना राज्यात, देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर एक अभिनव मॉडेल म्हणून ओळखली जाणार असल्याचा विश्वास ना. नाईक यांनी व्यक्त केला.



मंत्री गणेश नाईक यांच्या मनातली शहराविषयी खदखद उपमहापौर दशरथ भगत यांनी ओळखली आणि स्वच्छ शहर अभियानात आपले शहर देशात नंबर एकवर नक्की येणार, असा विश्वास महापौर सुजाता पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. या शहरात येणारी प्रत्येक व्यक्ती काम संपवून शहरातून बाहेर जाताना शहरातील स्वच्छता व सुगंध सोबत घेऊन जाणार आहे. नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी अनेक सामाजिक उपक्रम, कार्यक्रम होत असतात, परंतु शहर सुगंधी संकल्पना ना. नाईक यांना वाढदिवशी मिळालेली भेट अनोखी व सुंदर असल्याची भावना महापौर पाटील यांनी व्यक्त केली.

सुगंधी शहर अभियानात सार्वजनिक जागेला 'पालकत्त्व' निर्धारित करण्याची जनसहभागाची चळवळ अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने या अभिनव उपक्रमाची संकल्पना राबविण्यात येत आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील वास्तू, जागा आणि व्यक्ती हे या योजनेचे तीन प्रमुख घटक आहेत आणि स्वच्छतेच्या स्वयंजाणीवेतून पालकत्व नवी मुंबईतील सुजाण नागरिक नक्कीच घेतील. या अभियानासाठी लोकप्रतिनिधीदेखील साथ देतील, असे उपमहापौर दशरथ भगत यांनी अभियानाचा मूळ उद्देश उपस्थितांसमोर सांगताना स्पष्ट केले. या जनसहभाग चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहनदेखील त्यांनी केले.

यावेळी सुगंधी शहर अभियानात एक हजार नागरिकांनी पालकत्व स्वीकारले तसेच अंगण दत्तक योजना २०२६ या पुस्तिकेचे अनावरण, चित्रफितही उपस्थितांना दाखविण्यात आली.

व्यासपीठावर माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, सभागृह नेते सागर नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी महापौर सुधाकर सोनावणे, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, आरोग्य समिती सभापती डॉ. जयाजी नाथ, विविध विषय समित्यांचे सभापती, उपसभापती, नगरसेवक-नगरसेविका आणि पालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन नगरसेवक निशांत भगत यांनी केले, तर संदीप भगत यांनी मुख्य समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली. सूत्रसंचालन विजय कदम यांनी केले आणि नगरसेविका प्रीती भगत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### वेब पोर्टलचे लोकार्पण

नागरिकांना एका क्लिकवर अंगण दत्तक घेता यावे याकरिता https://www.sugandhishahar.org/ हे वेब पोर्टलदेखील विकसित करण्यात आले असून मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण करण्यात आले. या पोर्टलद्वारे केवळ नवी मुंबईच नव्हे; तर नवी मुंबई शहराविषयी सहवेदना असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला लॉग इन करून जागा दत्तक घेता येणार आहे. हे वेब पोर्टल कशा प्रकारे काम करते याची सविस्तर माहिती देणारे सादरीकरण करण्यात आले.

# दोन हजारांहून अधिक टाकाऊ वस्त्रांसह १३० जोड्या चपला संकलित

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी आणि जिजा वस्त्र पुनर्प्रक्रिया केंद्राचा संयुक्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जुने कपडे व इतर टाकाऊ वस्त्र कचऱ्यात न टाकता त्यांचा पुनर्वापर व पुनर्प्रक्रिया करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी आणि जिजा वस्त्र पुनर्प्रक्रिया केंद्र पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने वस्त्र संकलन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल तहसील कार्यालयाजवळ सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हे शिबिर पार पडले. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नागरिकांकडून दोन हजारांहून अधिक टाकाऊ वस्त्र तसेच १३० जोड्या बूट-चपलांचे संकलन करण्यात आले.

या संकलनामध्ये जुने कपडे, चादरी, बेडशीट, पडदे, पिशव्या, बूट-चपला आणि इतर वस्त्र साहित्याचा समावेश होता. संकलित साहित्याचे योग्य वर्गीकरण करून त्यातील वापरण्यायोग्य वस्तूंचा पुनर्वापर, आवश्यक वस्तूंची दुरुस्ती व पुनर्वापरासाठी तयारी तसेच



अनुपयोगी वस्त्रांची पुनर्प्रक्रिया व पुनर्प्राप्ती करण्यात येणार आहे.

"जुना कपडा कचरा नाही, तर एक नवी संधी आहे" या संदेशातून नागरिकांना वस्त्र कचऱ्याबाबत जागरूक करण्यात आले. वस्त्र कचरा कचराकुंडीत किंवा लँडफिलमध्ये जाण्यापासून रोखून त्याचा योग्य उपयोग करण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या अभियानासाठी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या अध्यक्ष स्नेहल कल्याणकर, सचिव विजयता कोठारी, उपाध्यक्ष बिजल मिराणी, खजिनदार ध्वनी तन्ना, संपादक प्रतिभा डांगी, क्लब प्रतिनिधी दुर्गा चौधरी, कार्यकारी सदस्य सिमरन सचदेव, क्लब सल्लागार हेतल बालाद, सदस्य जया मंगलानी, जागृती सत्रा, तनिषा चेतवानी आणि गौरी धात्रक यांनी विशेष सहकार्य केले.

"वस्त्र कचरा कमी करणे ही केवळ एका संस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांच्या सहकार्याने पनवेलला 'शून्य वस्त्र कचरा' या संकल्पनेकडे घेऊन जाण्यास निश्चितच मदत होईल," असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

या मोहिमेसाठी परिसरातील अनेक रहिवासी स्वयंस्फूर्तीने पुढे आले. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात जुने कपडे व पादत्राणे देऊन पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमाला पाठिंबा दिल्याबद्दल आयोजकांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

# मोहोपाडा तलावाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती

## गणेश विसर्जनासाठी मार्ग सुकर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा तलावाकडे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था, रस्त्यालगत साईडपट्टीचा अभाव तसेच तलावात वाढलेली जलपर्णी आणि तलावाच्या काठावर वाढलेले गवत व झुडपांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री गणेश विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी पुढाकार घेत रस्ता दुरुस्ती, साईडपट्टीचे काम आणि तलाव परिसराची स्वच्छता करून नागरिकांची मागणी पूर्ण केली.

मोहोपाडा तलावावर दरवर्षी दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस तसेच अनंत चतुर्दशीला मोठ्या संख्येने श्री गणरायांचे विसर्जन केले जाते. त्यामुळे विसर्जन घाटाकडे जाणारा रस्ता सुस्थितीत असणे आवश्यक आहे, मात्र रस्त्याच्या कडेला साईडपट्टी नसल्याने आणि तलावाजवळील रस्ता खराब झाल्याने गणेश विसर्जनावेळी भाविकांना अडथळ्यांचा सामना करावा लागण्याची शक्यता होती.

ही बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायत सदस्य आकाश जुईकर, रसिका खराडे, प्रतीक्षा राऊत यांनी पुढाकार घेत तलावाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती व साईडपट्टीचे काम करून घेतले. त्याचप्रमाणे गणपती घाट व तलावाच्या काठावरील परिसरातील वाढलेले गवत आणि झुडपे हटवून स्वच्छता करण्यात आली. तलावातील वाढलेली जलपर्णी हटविण्याचे कामही करण्यात आले.

गणेशोत्सवाच्या काळात भाविक व ग्रामस्थांना श्री गणेश विसर्जनासाठी सुरक्षित आणि सुकर मार्ग उपलब्ध व्हावा, तसेच तलाव परिसर स्वच्छ व व्यवस्थित राहावा या उद्देशाने करण्यात आलेल्या या कामाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

### निर्माल्य तलावात न टाकण्याचे आवाहन

दरम्यान, मोहोपाडा तलावकाठी निर्माल्य कलशाची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी श्री गणेश विसर्जनानंतर हार, फुले तसेच इतर निर्माल्य तलावात न टाकता ते निर्माल्य कलशातच टाकावे आणि तलावाचे पावित्र्य व स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन ग्रामपंचायत सदस्य आकाश जुईकर, रसिका खराडे, प्रतीक्षा राऊत यांनी केले आहे.

# नवी मुंबई महापौर चषक गणेशोत्सव स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रात अत्यंत उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहित करण्यासाठी नवी मुंबई महापौर गणेशदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी पारंपारिक स्पर्धेला अधिक व्यापक स्वरूप प्रदान करण्यात येत असून महापौर सुजाता पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार क्रीडा, सांस्कृतिक कार्य व युवक कल्याण समितीने यामध्ये घरगुती गणेशोत्सवाचाही समावेश केला आहे.

या दृष्टीने नवी मुंबई महापौर सार्वजिनक व घरगुती गणेशोत्सव स्पर्धा २०२६चे दिमाखदार आयोजन करण्यात आले असल्याची माहिती समितीचे सभापती गिरीश म्हात्रे यांनी दिली.

गणेशोत्सव हा लोकोत्सव निसर्गाचा सन्मान राखून पर्यावरणशील व प्लास्टिकमुक्त साजरा केला जावा असे आवाहन महापौर सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचेमार्फत




यापूर्वीच करण्यात आलेले आहे. त्यामुळे गणेशोत्सवात पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या गणेशमूर्तीची स्थापना, मूर्तीची उंची सहा फूटापर्यंत मर्यादित असावी, तिचे विसर्जन १७० इतक्या मोठ्या संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावातच करावे, सजावटीत प्लास्टिक व थर्माकोलचा वापर न करता नैसर्गिक साहित्याचा वापर करावा, उत्सवानिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमात आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण जागरूकता, संस्कृती संवर्धक व प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवावेत, असे सूचित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ पुरस्कार, उत्कृष्ट घरगुती गणेशोत्सव पुरस्कार (पाच दिवस), उत्कृष्ट घरगुती गणेशोत्सव पुरस्कार (दहा दिवस), घरगुती गणेशोत्सव पुरस्कार (दहा दिवस), पर्यावरणपूरक उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुरस्कार असे प्रत्येकी तीन पुरस्कार रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र अशा स्वरूपात प्रदान करण्यात येणार आहेत. याशिवाय उत्कृष्ट गणेशमूर्ती पुरस्कार, उत्कृष्ट देखावा (संकल्पना) पुरस्कार, उत्कृष्ट सजावट पुरस्कार, उत्कृष्ट पारंपारिक गणेशोत्सव पुरस्कार, उत्कृष्ट नाविन्यपूर्ण संकल्पना पुरस्कार, उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम पुरस्कार, उत्कृष्ट सामाजिक संदेश पुरस्कार अशा स्वरूपाचे स्वतंत्र उल्लेखनीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. अशाप्रकारे एकूण चार लाख २७ हजार रक्कमेचे पुरस्कार सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रासह प्रदान करण्यात येणार आहेत.

नवी मुंबई महापौर चषक सार्वजनिक व घरगुती श्रीगणेशोत्सव स्पर्धा २०२६मध्ये नवी मुंबईतील जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी तसेच नागरिकांनी पर्यावरणशील गणेशोत्सव साजरा करून सहभागी व्हावे, असे आवाहन क्रीडा, सांस्कृतिक कार्य व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीश म्हात्रे, उपसभापती राजू मढवी आणि सर्व समिती सदस्य यांच्या वतीने करण्यात येत आहे.

### ऑनलाईन अर्ज भरून सहभागाचे आवाहन

या स्पर्धेत सहभागाकरिता www.nmmcganesha.in या स्पर्धेच्या संकेतस्थळावर विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. उत्कृष्ट घरगुती गणेशोत्सव स्पर्धा (पाच दिवस) करिता अर्ज भरण्याचा अंतिम १६ सप्टेंबर असून इतर सर्व पुरस्कार श्रेणीकरिता २० सप्टेंबरपर्यंत अर्ज भरणे गरजेचे आहे. मुदतीनंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावयाची आहे.

# चित्रपट कलाकारांना कवी अनिल दाभाडे यांच्याकडून काव्यसंग्रह भेट





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी, मोहोपाडा, रिस, पाताळगंगा, चांभार्ली, गुळसुंदा, आपटा परिसरात कवी, लेखक, चारोळीकार, निवेदक, प्रकाशयोजनाकार आणि पक्षीनिरीक्षक म्हणून परिचित असलेले कवी अनिल दाभाडे यांच्या साहित्यिक कार्याची विशेष छाप निर्माण झाली आहे. त्यांच्या साहित्यिक योगदानाची परिसरात मोठ्या आदराने दखल घेतली जाते.

दरम्यान, पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'एकदा पहावं करून' या नाटकाच्या निमित्ताने मराठी चित्रपट व नाट्यसृष्टीतील कलाकारांची भेट झाली. यावेळी कवी अनिल दाभाडे यांनी आपल्या काव्यसंग्रहांची सप्रेम भेट कलाकारांना दिली.

कवी दाभाडे यांनी आतापर्यंत पाच हजारांहून अधिक चारोळ्या, आठशेहून अधिक कविता तसेच सुमारे चारशेहून अधिक लेख लिहिले आहेत. गड-किल्ले, प्राचीन मंदिरे, सागरकिनारे तसेच परिसरात स्थलांतर करून येणारे पक्षी अशा विविध विषयांवर त्यांनी सातत्याने लेखन केले आहे. त्यांच्या लेखणीतून निसर्ग, इतिहास आणि सामाजिक जाणिवांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळतो.

दाभाडे यांच्या साहित्यिक प्रवासातील आतापर्यंत चार काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून हे साहित्य विविध रसिकांपर्यंत पोहचविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.

सुप्रसिद्ध हास्यकलाकार वैभव मांगले यांना कवी दाभाडे यांच्या 'चांदण्या आणि मी', हास्यकलाकार आनंद इंगळे यांना 'काजवा' तर अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांना 'सांजधारा' हे काव्यसंग्रह सप्रेम भेट देण्यात आले.

कवी दाभाडे यांच्या साहित्यिक वाटचालीची माहिती जाणून घेतल्यानंतर कलाकारांनी आनंद व्यक्त करत त्यांच्या पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या.

# पत्रकार संघाच्या नवी मुंबई अध्यक्षपदी दशरथ चव्हाण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांच्या नवी मुंबई कोकण विभागीय कार्यालयात कार्यकारिणीची बैठक उत्साहात झाली. यावेळी नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी दशरथ शांताराम चव्हाण यांची नियुक्ती झाली आहे.

संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, प्रदेश संघटक संजय भोकरे, महासचिव डॉ. विश्वास आरोटे तसेच राज्य प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली.

नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी जवाहरलाल किसन पोळ, उपाध्यक्षपदी कल्याण हरिभाऊ हनवते, सचिवपदी विष्णू सुखदेव बुरे, खजिनदारपदी असते आलम मिर, सल्लागारपदी सुनील गायकवाड, सुभाष फकीरा जाधव, वाशी विभाग प्रमुखपदी दीपक जयराम सोनवणे, सदस्य म्हणून समीर मेहबूब शेख, संतोष जगन्नाथ गोळे, कलाम अरुण शहा, सुरेश मनोहर दुधाने, विनोद बाबुराव धुरंदर आणि जितेंद्र साईनाथ चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. पत्रकारांचे संघटन अधिक मजबूत करणे, पत्रकारांच्या अडचणी सोडविण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करणे तसेच पत्रकारांच्या हक्क व हितासाठी प्रभावीपणे काम करण्याबाबत बैठकीत मार्गदर्शन करण्यात आले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# रुपाली पाटील यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

## शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची जि.प.कडून दखल

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून सातत्याने नाविन्यपूर्ण, कृतीआधारित व विद्यार्थीकेंद्रित शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या गुळसुंदे गावच्या ग्रामस्थ आणि रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहोपाडा येथे कार्यरत असणाऱ्या विषय शिक्षिका रूपाली अनिल पाटील यांना सन २०२६चा मानाचा रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

शिक्षिका रुपाली पाटील यांनी पारंपरिक अध्यापन पद्धतीला नाविन्याची जोड देत विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता कृतीतून शिकावे, प्रयोगातून संकल्पना समजून घ्याव्यात आणि स्वतः विचार करून शिकण्याची सवय लागावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. या कार्याची दखल घेत महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आयोजित दिमाखदार सोहळ्यात त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याला रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हा परिषद शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संजय नाईकडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.




रुपाली पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात आपली २१ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केली आहेत. त्यांनी आजवर आंतरराष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा स्तरावर शोधनिबंध सादरीकरण व व्हिडिओ निर्मिती स्पर्धांमध्ये यश मिळवले आहे. त्याचप्रमाणे दीक्षा ॲप व व्हर्च्युअल क्लाससाठी ई-कंटेट निर्मिती करत अध्यापनात डिजिटल तंत्रज्ञानाचा व आनंददायी पद्धतींचा प्रभावी वापर केला आहे.

शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासासाठी परिसरातील जागरूक ग्रामस्थांच्या विशेष प्रयत्नांतून कंपन्यांच्या सीआरएस फंडातून शाळेला सायन्स लॅब, मिनी सायन्स सेंटर, कॉम्प्युटर्स आणि प्रगत शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. या आधुनिक सुविधा आणि सौ. पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे शाळेतील विद्यार्थ्यांनी इन्स्पायर अवॉर्ड, नॅशनल चिल्ड्रन सायन्स कॉंग्रेस विज्ञान प्रदर्शनगणित संबोध परीक्षा आणि एनएमएमएस शिष्यवृत्तीसारख्या स्पर्धा परीक्षेत जिल्हा व राष्ट्रीय स्तरावर घवघवीत यश मिळवले आहे.

या बहुमानाबद्दल खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, गटशिक्षण अधिकारी श्री. नाईक, केंद्रप्रमुख श्री. परदेशी, मुख्याध्यापिका राखी खराडे, खालापूर तालुक्यातील शिक्षकवृंद, गुळसुंदे व मोहोपाडा परिसरातील ग्रामस्थांकडून सौ. रुपाली पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जि.प.च्या माध्यमातून महिला भगिनींना पाठबळ देणार -सभापती वैकुंठ पाटील



## सर्वांगिनी महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा

**नागोठणे : बातमीदार**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी महिलांसाठी विविध योजना आणून नारीशक्तीला ताकद देत आहेत. देशाच्या राष्ट्रपतीपदी द्रौपदी मुर्मू यांच्या रूपाने एक महिला विराजमान आहे. त्यामुळेच महायुती सरकारच्या मागे महिला खंबीरपणे उभ्या आहेत. आम्हीसुद्धा रायगड जिल्हा परिषदेतील ताकदीचा उपयोग महिला भगिनींसाठी करून महिला शक्तीला खऱ्या अर्थाने ताकद देण्याचे काम सदैव करणार आहोत, असे अभिवचन रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन खात्याचे सभापती वैकुंठ पाटील यांनी दिले. ते नागोठणे सर्वांगिनी महिला प्रभाग संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायत राज विभाग, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आणि तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती रोहा अंतर्गत सर्वांगिनी महिला प्रभाग संघ, नागोठणे यांची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. या सभेला रजिपच्या माजी उपाध्यक्ष नीलिमा पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष शर्मिला पाटील, पंचायत समितीच्या सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, भाजप राज्य सचिव श्रेया कुंटे, रोहा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी अमृता उंद्रेपाटील, सदस्य समृद्धी कोळी, अरुणा हंबीर, दिशा समितीचे सदस्य शिवराम शिंदे, नागोठणे ग्रामपंचायतीचे उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, भाजप माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे , तालुका महामंत्री एकनाथ ठाकूर, राजेंद्र लवटे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष अपर्णा सुटे, सचिन ठोंबरे, पूनम काळे, शबाना मुल्ला, अशा शिर्के, सर्वांगिनी महिला प्रभाग संघाच्या समन्वयक नेहा पाटील, तालुका अभियान व्यवस्थापक अक्षय खंदारे, प्रभाग संघाचे अध्यक्ष राजश्री दाभाडे, कोषाध्यक्ष स्मिता ताडकर, सचिव मोनिका आवाद, लेखापाल कृतिका कदम, वर्षा जांबेकर, निष्ठा विचारे, दीपेश्री घासे आदींसह नागोठणे प्रभागातील बचत गटांच्या महिला यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी सभापी वैकुंठ पाटील पुढे म्हणाले की, रायगड जिल्हा परिषदेने आमच्या कृषी व पशुसंवर्धन खात्याच्या माध्यमातून दोन अभिनव योजना आणल्या आहेत. पशुसंवर्धन खात्यातून जिल्ह्यातील २० हजार महिलांना १०० पिलांची कुक्कुटपालन योजना, तर कृषी खात्याच्या माध्यमातून १५ हजार महिलांना भाजीपाला किटचे वाटप या दोन योजना आम्ही येत्या दोन महिन्यांत मार्गी लावणार आहोत.

नीलिमा पाटील यांनी आपल्या मनोगतात बचत गट हे सर्वांना उपयोगी पडत असून अडचणीच्या काळात कुटुंबाच्या संसाराला आधार देत असल्याचे सांगितले. विजया पाशिलकर यांनी आपल्या मनोगतात महिलांनी आज एकजुटीची ताकद दाखविल्याचे सांगून महिलांना प्रोत्साहित केले. शर्मिला पाटील म्हणाल्या की, बचत गटामुळे स्त्री शक्तीच्या जागृतीची आणि एक नवीन पर्वाची सुरुवात झालेली आहे.

उपसभापती संजय मांडलुस्कर यांनी आपल्या मनोगतात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस ज्याप्रमाणे महिलांसाठी विविध योजना आणत आहेत; त्याप्रमाणे रायगड जिल्ह्यातही खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे महिलांना सक्षम करण्यासाठी उल्लेखनीय कार्य करत असल्याचे नमूद केले.

सभेचे प्रस्ताविक संघाच्या अध्यक्ष राजश्री दाभाडे यांनी केले. लेखापाल कृतिका कदम यांनी वार्षिक अहवाल सादर केला. सूत्रसंचालन सोनम राकेश शिंदे यांनी केले. सभा यशस्वी होण्यासाठी सर्व ग्रामसखी, ग्रामसंघ पदाधिकारी, लेखापाल व समूह सदस्य यांनी सहकार्य केले.

# श्रीवर्धन शहरासह तालुक्यात मोकाट गुरे, घोड्यांचा उपद्रव

## पिकांचे होतेय नुकसान, अपघातालाही निमंत्रण

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरासह तालुक्यात; त्याचप्रमाणे दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत व म्हसळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोकाट गुरे व घोडे यांचा प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. ते रस्त्यावर येऊन बसतात. त्यामुळे अपघाताचा धोका आहे.

वाहनचालकांनी रस्त्यावरून जात असताना कितीही जोराने हॉर्न वाजवला तरीही गुरे उठत नाहीत. यांना गाडीमधून उतरून किंवा बाईकवरून उतरून हाकलावे लागते. रात्रीच्या वेळीदेखील मोकाट फिरणारी गुरे व घोड्यांमुळे अनेकदा गंभीर अपघात झालेले आहेत. काही जणांनी आपले प्राण गमावले आहेत, तर काहीजण जायबंदी झालेले आहेत.

खेडेगावातील बहुतांश शेतकरी हे शेती करणे परवडत नसल्यामुळे आपल्या कुटुंबासह कामधंद्यासाठी मुंबईसारख्या शहरांमध्ये जाऊन राहत आहेत, पण या ठिकाणी त्यांची असलेली गुरे मोकाट सोडलेली आहेत. याशिवाय श्रीवर्धन आणि दिवेआगर समुद्रकिनाऱ्यांवर अनेकजण घोडा सवारी, घोडागाडी, टांगा अशाप्रकारे धंदे करत असतात. पावसाळ्यात हवामान खराब असल्यामुळे समुद्रकिनारी जाण्यास बंदी असते. अशावेळी हे घोडागाडीवाले आपले घोडे बिनधास्तपणे मोकाट सोडून देतात. पर्यायाने याचा त्रास विविध परिसरातील नागरिकांना, रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व काही शेतकऱ्यांनादेखील होतो.

पूर्वी प्रत्येक गावामध्ये कोंडवाडे होते. आता ते उपलब्ध नसल्यामुळे ही जनावरे पकडल्यानंतर त्यांना ठेवणार कुठे? हा प्रश्न सर्वांच्या पुढे उभा राहतो. प्रशासनाने या गोष्टीकडे गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. मोकाट गुरे व घोडे यांचे मालक सापडत नसतील तर अशा घोड्यांना व गुरांना पकडून गोशाळेत अथवा घोडे संगोपन करणाऱ्या संस्थांकडे पाठवण्याची गरज आहे.

दरम्यान, रात्रीच्या वेळी गुरे पटकन दिसावी यासाठी त्यांच्या शिंगांना किंवा गळ्यामध्ये रेडियमचे पट्टे बांधण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र अशा किती जनावरांच्या गळ्यात हे पट्टे बांधणार? हा प्रश्न उपस्थित होतो.

श्रीवर्धन नगर परिषद, पंचायत समिती, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, उपविभागातील सर्व पोलीस ठाणी यांनी या सर्व गोष्टीवर संयुक्त बैठक घेऊन योग्य ती दिशा ठरवण्याची आवश्यकता आहे. अनेक वेळा मोकाट गुरांकडून व घोड्यांकडून भात व अन्य शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जाते, तर या जनावरांमुळे रस्त्यावर होणाऱ्या अपघातांमध्ये नागरिकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागतो. तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर नागरिकांच्या बैठका घेऊन मोकाट घोडे, गुरे कोणाची आहेत? याचा शोध त्या त्या ठिकाणचे ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील यांना कशाप्रकारे घेता येईल यासाठी प्रशासनाने उपाययोजना करावी.

गणेशोत्सव सुरू होत असून अनेक चाकरमानी आपल्या गावाकडे येत आहेत. ऐन सणासुदीच्या काळात अशा मोकाट घोड्यांमुळे व गुरांमुळे कोणाचा अपघात झाल्यास, नागरिकांवर ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये संकट येऊ शकते. प्रशासनाने यावर निर्णय घेण्याची मागणी जनतेमधून केली जात आहे.



# रेल्वे अपघात रोखणारे संतोष जाधव, केतन धुळे यांचा जीएम अवॉर्डने सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शेलू येथील संतोष जाधव आणि मार्केवाडी येथील केतन धुळे यांचा मध्य रेल्वे महाव्यवस्थापक सेफ्टी अवॉर्डने सन्मान करण्यात आला. मोटरमन असलेले जाधव यांनी अंबरनाथ स्थानकात, तर ट्रॅक मॅनेजर धुळे यांनी बोरघाटात रेल्वे अपघात रोखण्याची भूमिका बजावली होती.




मध्य रेल्वेच्या वतीने विविध कामगारांना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जीएम सेफ्टी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील सभागृहात अवॉर्ड वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. संतोष जाधव यांनी अंबरनाथ स्थानकात उपनगरीय रेल्वे मार्गावर लोखंडी डब्बा दिसून आल्याने तत्काळ वरिष्ठ स्तरावर कार्यवाही होण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे मोठा अपघात टळला होता आणि त्यांच्या या कार्याची दखल घेऊन जाधव यांना जीएम सेफ्टी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

लोणावळा घाटात १३ ऑगस्ट रोजी ड्यूटीवर असलेले ट्रॅक मॅनेजर केतन धुळे यांना या रेल्वे मार्गावर बोगदा क्रमांक १२ येथे मोठा दगड येऊन पडला असल्याचे दिसून आले होते. त्यावेळी धुळे यांनी डाऊन लाइनवरील सर्व वाहतूक थांबवून ठेवण्याची आणि सुरक्षितता यासाठी मोठे प्रयत्न केले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन केतन धुळे यांनी त्वरित नियमानुसार प्रभावित ट्रॅक सुरक्षित केला आणि मिनी कंट्रोल, लोणावळा तसेच संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली. त्यांची सतर्कता, तत्पर कार्यवाही आणि प्रसंगावधान यामुळे संबंधित सेक्शन वेळेत सुरक्षित करण्यात आले आणि घाट सेक्शनमध्ये होऊ शकणारा मोठा रेल्वे अपघात टळला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन सेफ्टी अवॉर्डसाठी शिफारस करण्यात आली होती.

## मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्कार प्रदान

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी दिनांक १६ कर्मचाऱ्यांना त्यांच्या सतर्कतेबद्दल, कर्तव्यनिष्ठेबद्दल, प्रसंगावधानाबद्दल आणि रेल्वेच्या सुरक्षित परीचालानासाठी केलेल्या वेळेवर कार्यवाहीबद्दल सुरक्षा पुरस्कार देऊन सन्मानित केले.

कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांनी दाखवलेली उत्कृष्ट सतर्कता आणि समर्पण यांच्या कौतुकार्थ हे सुरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यांच्या वेळेवर केलेल्या हस्तक्षेपामुळे संभाव्य अनुचित घटना टळल्या आणि प्रवासी, रेल्वे कर्मचारी व रेल्वे परीचालनाची सुरक्षा सुनिश्चित झाली. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तिपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा गौरव करणारा लेख आणि रोख बक्षीस यांचा समावेश आहे. कार्यक्रमास मध्य रेल्वेचे विविध विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सर्वांनी पुरस्कार्थींचे अभिनंदन केले.

# भारताला सुजलाम सुफलाम बनवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत –मिलिंद परांडे

**कर्जत : प्रतिनिधी**

भगवान श्रीकृष्णाला मारण्यासाठी अनेक शक्ती त्यांच्या जन्मापासूनच कामाला लागल्या होत्या. पुतना मावशी दूध पाजण्याच्या बहाण्याने आली होती. आताही काही पुतना मावश्या फिरत असून अनेक अमिषे दाखवून आपल्या माणसांचे धर्मांतर करीत आहेत. ते रोखण्याची आवश्यकता आहे तसेच भारताला सुजलाम सुफलाम करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी येथे केले.




विश्व हिंदू परिषद कोकण प्रांत कुलाबा जिल्हा कर्जत प्रखंडाच्या वतीने रॉयल गार्डनच्या सभागृहात विश्व हिंदू परिषदेच्या ६२व्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी परांडे बोलत होते.

कार्यक्रमास इस्कॉनचे चैतन्य दास, मैत्री बोध परिवाराचे श्री श्री मित्र जिवजी, विश्व हिंदू परिषद धर्मप्रसार केंद्रीय सहमंत्री दीपक गायकवाड, कुलाबा जिल्हा मंत्री मोहन पार्टे, कोकण प्रांत मंत्री मोहन सालेकर, कर्जत प्रखंड मंत्री अनंत हजारे, प्रसन्न खेडेकर, दिनेश रणदिवे आदी उपस्थित होते.

यावेळी श्री श्री मित्र जिवजी म्हणाले की, आपली संस्कृती आणि संस्कार आपण मागे सोडले आहेत. आपल्यातील आत्मशक्ती जागृत करणे गरजेचे आहे. आपण फक्त ऐकतो, परंतु काही करत नाही. मी स्वतः बदलेन असा किती लोक विचार करतात? काही झाले तरी जागृत होणे खूप जरुरीचे आहे.

चैतन्य दास यांनी, गुरूंची देवासारखी पूजा होऊ शकते, परंतु गुरु देव होऊ शकत नाही, असे म्हटले. प्रसन्न खेडेकर यांनी पुनर्गठीत केलेल्या विविध समित्या जाहीर केल्या. सूत्रसंचालन शाम कडव यांनी केले, तर आभार अमोल सूर्यवंशी यांनी मानले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढदिवस अभीष्टचिंतन



**खोपोली : भाजपचे शहर सेक्रेटरी विनायक माडपे यांना वाढदिवसानिमित्त उपनगराध्यक्ष विक्रम साबळे आणि शहराध्यक्ष अजय इंगुलकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा मोर्चाचे डॉ. निकेत पाटील, करण यादव, उत्तर भारतीय सेवा संघाचे बबलू उपाध्याय, अल्पेश, सोनाली राक्षे आदी उपस्थित होते.**

## कल्पेश ठाकूर यांचा जीवनदूत पुरस्काराने गौरव

**पेण : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातर्फे रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत जीवनदूत सन्मान सोहळा आरसीएफ सभागृह, कुरूळ येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये अपघातावेळी धावून येणारे पेणचे कल्पेश ठाकूर यांनाही गौरविण्यात आले.

व्यासपीठावर रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य-कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, उपनगराध्यक्ष मानसी म्हात्रे, रिलायन्स फाउंडेशनचे शशांक गोयल, रमेश धनावडे आदी उपस्थित होते. पुरस्काराबद्दल ठाकूर यांचे अभिनंदन होत आहे.

# नवघर शाळेत विद्यार्थ्यांनी केले अध्यापन



**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथे शिक्षक दिनाच्या निमित्ताने इयत्ता सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांनी एक दिवस शिक्षक बनून इयत्ता पहिलीपासून सातवीपर्यंतच्या वर्गांचे अध्यापन केले.

उपक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थी शिक्षकांनी शाळेतील शिक्षकांचे स्वागत करून त्यांचा सन्मान केला. त्यानंतर विद्यार्थी शिक्षकांनी विविध वर्गांमध्ये जाऊन आपल्या आवडीच्या विषयांचे अध्यापन केले. हसत-खेळत शिक्षण, मनोरंजक कृती, खेळ, प्रश्नोत्तर, कविता, संवाद आणि विविध शैक्षणिक पद्धतींचा वापर करत विद्यार्थ्यांनी अध्यापनाचा मनमुराद आनंद घेतला.

या उपक्रमात परी, खुशी, आर्या, सामर्थ्य, शुभम, आरोही, दीपाली आणि उर्मी या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थी शिक्षक शुभम ठाकूर याने आपला अनुभव सांगताना, "आज शिक्षक होऊन मुलांना शिकवताना खूप आनंद झाला. शिक्षक म्हणून वर्ग घेणे वेगळेच वाटले. मुलांना समजावून सांगताना शिक्षकांचे काम किती आनंददायी आणि जबाबदारीचे आहे, याचा अनुभव आला," असे सांगितले.

परी आणि खुशी यांनी वर्गात सुंदर कविता सादर करून विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात सहभागी करून घेतले. विद्यार्थ्यांनीही आपल्या मोठ्या दादांना-ताईंना शिक्षकाच्या भूमिकेत पाहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन विषयशिक्षिका वृषाली गुरव व उपशिक्षक राजेंद्र अंबिके यांनी केले. विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व केवळ ऐकून नव्हे, तर प्रत्यक्ष शिक्षकाची भूमिका अनुभवून समजावे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे आयडॉल शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी सांगितले.

# भारताची फायनलमध्ये धडक

## सुप्रियाच्या हॅट्ट्रिकने कोरियाचा उडाला ५–१ने धुव्वा



**मोक्वी (चीन) : वृत्तसंस्था**

ड्रॅग–फ्लिकमध्ये तरबेज असलेल्या सुप्रियाच्या शानदार हॅटट्रिकच्या जोरावर भारतीय महिला हॉकी संघाने दक्षिण कोरियाचा ५–१ असा दणदणीत पराभव करत ज्युनियर आशिया करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीचा हा सामना गाजवणाऱ्या सुप्रियाने तीन पेनल्टी कॉर्नरचे अचूक गोलमध्ये रूपांतर करत हॅटट्रिक केली आणि गतविजेत्या भारताने पुन्हा एकदा जेतेपदासाठी आपण सज्ज आहोत हे दाखवून दिले. अंतिम सामन्यात भारताचा सामना चीन आणि जपान यांच्यातील दुसऱ्या उपांत्य सामन्यातील विजेत्या संघाशी होईल.

भारतासह कोरियानेही सुरुवातीला सावध पवित्रा घेतला. बाद फेरीतील सामन्याचा दबाव यामुळे सुरुवातीचा काही काळ बचावात्मक आणि सावध खेळ पाहायला मिळाला. भारताने हळूहळू लय पकडली आणि गोल करण्याच्या संधी निर्माण करण्यास सुरुवात केली. अखेर १३ व्या मिनिटाला कोंडी फोडली. नियोजनबद्ध आक्रमणानंतर मधू सिदारने गोल करत भारताला १–० अशी आघाडी मिळवून दिली.दुसऱ्या सत्रात भारतीयांनी सामन्यावर वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केली. कोरियाच्या गोलक्षेत्रात सातत्याने धडक मारली. १७ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि सुप्रियाने अचूक ड्रॅग–फ्लिक करत २–० अशी आघाडी मिळवून दिली. २१ व्या मिनिटाला त्यांच्या आक्रमक खेळाचे पुन्हा फळ मिळाले.

सुखवीर कौरने गोल केला आणि भारताची आघाडी ३–० अशी झाली.मध्यंतरानंतर भारताने जोरदार सुरुवात केली आणि ३३ व्या मिनिटाला आघाडी आणखी वाढवली. पुन्हा मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर सुप्रियाने गोल केला. हा तिचा सामन्यातील दुसरा गोल ठरला. दरम्यान, दक्षिण कोरियाने जोरदार प्रयत्न सुरूच ठेवले. ५६व्या मिनिटाला भारताला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला. सुप्रियाने पुन्हा एकदा अप्रतिम अचूकतेने गोल करत आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली.

# अमेरिकन ओपन : शेल्टन विरुद्ध इव्हेरेव होणार अंतिम लढत



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अमेरिकन ओपन स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पुरुष विभागात बेन शेल्टन आणि अलेक्झांडर इव्हेरेव यांच्यात विजेतेपदाची लढत होणार आहे. शेल्टनच्या रूपाने प्रदीर्घ कालावधीनंतर अमेरिकेला घरच्या कोर्टवरील या स्पर्धेत मायदेशातील विजेता मिळू शकेल. गतविजेत्या कार्लोस अल्काराझला पराभवाचा धक्का देणाऱ्या शेल्टनने उपांत्य सामन्यात टियाफोचा ४–६, ६–३, ६–३, ७–५ असा पराभव केला. अमेरिकेला पुरुषांच्या ग्रँडस्लॅममध्ये विजेतेपद मिळवून देणारा शेवटचा खेळाडू अँडी रॉडिक होता.

त्याने २००३ मध्ये या यूएस ओपन स्पर्धेत विजेतेपद मिळवले होते.टियाफोला यूएस ओपनच्या उपांत्य फेरीत तिसऱ्यांदा पराभव पत्करावा लागला. या तिन्ही उपांत्य सामन्यांमध्ये त्याचा सामना अमेरिकन खेळाडूंशी झाला. २०२४ मध्ये टेलर फ्रिट्झने त्याचा पराभव केला होता आणि त्यानंतर फ्रिट्झला यानिक सिनरकडून पराभव पत्करावा लागला.पहिल्या सेटमध्ये टियाफोने अचूक फटके मारले. त्याने केवळ तीन सोप्या चुका केल्या, तर शेल्टनने १४ चुका केल्या. ४–४ अशा स्थितीत शेल्टनने केलेल्या दुहेरी चुकीमुळे टियाफोला ब्रेक पॉइंट मिळाला.

दुसऱ्या सेटमध्ये शेल्टनने ताशी १४४, १३९ आणि १४० किमी वेगाच्या सर्व्हिस टाकल्या. त्यापैकी शेवटच्या दोन सर्व्हिस बिनतोड ठरल्या आणि त्या सेटमध्ये शेल्टनने निर्णायक आघाडी मिळवली.तिसऱ्या सेटच्या अखेरच्या गेममध्ये सामन्याला निर्णायक वळण मिळाले. टियाफो सर्व्हिस राखण्यासाठी जीव तोडून प्रयत्न करीत होता.

# रायबाकिनाने जिंकले यूएस ओपन

## सबालेंकाची हॅट्ट्रिक हुकली



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यूएस ओपन २०२६ महिला एकेरीचे विजेतेपद कझाकस्तानच्या एलेना रायबाकिनाने जिंकले. शनिवारी आर्थर ॲश स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात रायबाकिनाने अरिना सबालेंकाला ६–४, ५–७, ६–२ असे पराभूत केले. हे रायबाकिनाचे पहिलेच यूएस ओपन विजेतेपद ठरले. दोन तास २१ मिनिटे रंगलेल्या या सामन्याचा शेवट उत्कृष्ट एसने झाला.

रायबाकिनाने चॅम्पियनशिप पॉइंटवर एक शक्तिशाली शॉट खेळत कारकिर्दीतील महत्त्वाचा विजय मिळवला. हे तिचे एकूण तिसरे ग्रँड स्लॅम विजेतेपद ठरले. रायबाकिनाच्या विजयामुळे सबालेंकाचे ऐतिहासिक हॅट्ट्रिकचे स्वप्न भंगले आहे. ओपन इरामध्ये सलग तीन यूएस ओपन जिंकणारी केवळ तिसरी महिला होण्यापासून सबालेंका एक पाऊल दूर होती, मात्र रायबाकिनाने तिला रोखले. मागील काही स्पर्धांपासून रायबाकिनाने सबालेंकाला चांगलेच आव्हान दिले आहे.

तिने यावर्षीच्या डब्ल्यूटीए फायनल्स आणि ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये सबालेंकाला पराभूत केले होते. या दमदार कामगिरीमुळे तिने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानही गाठले आणि आता यूएस ओपनच्या अंतिम सामन्यात पुन्हा एकदा बेलारूसच्या खेळाडूला पराभूत केले.पहिला सेट रायबाकिनाने जिंकला, मात्र दुसऱ्या सेटमध्ये सबालेंकाचे वर्चस्व दिसले. सेट ४–५ असताना रायबाकिनाने दोन ब्रेक पॉइंट वाचवून सेट बरोबरीत आणला. त्यानंतर सबालेंकाने सर्व्हिस राखत ६–५ अशी आघाडी घेतली. या सेटमध्ये नंतर रायबाकिनाने काही चुका केल्या आणि सबालेंकाने हा सेट ७–५ असा जिंकला. तिसऱ्या सेटमध्ये रायबाकिनाने आक्रमक खेळ केला. तिने ४–२ अशी आघाडी घेत सामन्यावर नियंत्रण मिळवले. ५–२ असा सेट असताना रायबाकिना विजेतेपदासाठी सर्व्ह करण्यास आली.

# इंग्लंडच्या विजयाने डब्ल्यूटीसी गुणतालिकेत उलथापालथ

## भारत पाचव्या स्थानी कायम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडने एजबॅस्टन येथील तिसऱ्या कसोटी सामन्यात आठ गडी राखून दणदणीत विजय मिळवत पाकिस्तानविरुद्ध ३–० असा निर्भेळ विजय नोंदवला. यजमान इंग्लंडने ही एकतर्फी मालिका अनुक्रमे एक डाव आणि १०३ धावा, १९४ धावा आणि आठ गडी राखून आपल्या नावावर केली. अंतिम कसोटी सामन्यापूर्वी पाकिस्तानच्या संघात मोठे बदल करण्यात आले होते, तरीही त्यांचा हा दौरा निराशाजनक रीतीने संपला.

एजबॅस्टन कसोटीआधी संघात आणि प्रशिक्षक वर्गात अनेक बदल करण्यात आले, परंतु या बदलांचा सामन्याच्या निकालावर कोणताही परिणाम झाला नाही. पहिल्या डावात पाकिस्तानचा संघ अवघ्या १३३ धावांत गारद झाला. या मालिकेत पाकिस्तानला २०० हून अधिक धावा करण्यात अपयशी ठरण्याची ही पाचवी वेळ होती. दुसऱ्या डावात मात्र त्यांनी पुनरागमन करत ४४९ धावा उभारल्या. यामध्ये अझान अवैस, शान मसूद, बाबर आझम आणि पदार्पण करणाऱ्या रझाउल्ला यांच्या अर्धशतकांचा समावेश होता.

तळाच्या फलंदाजांमधील रझाउल्लाची कामगिरी लक्षवेधी ठरली. इंग्लंडने पहिल्या डावात तब्बल ३२० धावांची भक्कम आघाडी घेत सामन्यावर आधीच पकड मजबूत केली होती. त्यांच्या पहिल्या पाच फलंदाजांनी अर्धशतके ठोकली.जिंकण्यासाठी १३० धावांचे लक्ष्य गाठताना इंग्लंडने पहिल्याच षटकात बेन डकेट आणि एमिलिओ गे यांच्या रूपात आपले दोन्ही सलामीवीर गमावले. मोहम्मद अब्बासने हे दोन्ही बळी घेतले. त्यानंतर जो रूट आणि जॉर्डन कॉक्स यांनी नाबाद अर्धशतके झळकावत इंग्लंडला विजय मिळवून दिला.

या विजयामुळे इंग्लंडची गुण टक्केवारी सुधारून ३८.५४ टक्के झाली आहे. दुसरीकडे गुणतालिकेत नऊ संघांच्या यादीत पाकिस्तान सर्वात शेवटी कायम असून त्यांची गुण टक्केवारी आणखी घसरून १४.८१ टक्क्यांवर आली आहे. या चालू चक्रात ११ सामन्यांपैकी ५ विजय, ४ पराभव आणि २ अनिर्णित सामन्यांसह ५१.५२ टक्के गुणांसह भारतीय संघ डब्ल्यूटीसी गुणतालिकेत पाचव्या स्थानावर कायम आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील भारताचे पुढील आव्हान आता न्यूझीलंडविरुद्ध असणार आहे.

# मोहम्मद सिराजकडे हैदराबादची धुरा

## रणजीसाठी कर्णधारपदी नियुक्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दुलीप ट्रॉफी २०२६ ची सांगता झाल्यानंतर देशांतर्गत क्रिकेटपटूंचे लक्ष आता आगामी रणजी हंगामाकडे लागले आहे. विविध राज्यांच्या संघांनी या महत्त्वपूर्ण स्पर्धेसाठी तयारी सुरू केली आहे. भारतीय कसोटी संघाचा प्रमुख सदस्य आणि वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आता आपल्या राज्य संघाचे नेतृत्व करण्याची मोठी जबाबदारी स्वीकारणार आहे. हैदराबाद क्रिकेट असोसिएशनने २०२६–२७ च्या रणजी ट्रॉफीसाठी मोहम्मद सिराजची संघाचा नवीन कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे.

आगामी रणजी हंगामात मोहम्मद सिराज हैदराबाद संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. हैदराबाद क्रिकेट असोसिएशनच्या वरिष्ठ निवड समितीने शुक्रवारी हा निर्णय घेतला. रेड बॉल हंगामासाठी सिराज संघाची धुरा सांभाळणार आहे.

# जो रूटचा कसोटीत सर्वाधिक अर्धशतकांचा विक्रम

## सचिन तेंडुलकरला टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंडचा स्टार फलंदाज जो रूट याने कसोटी क्रिकेटमध्ये आणखी एक मोठा इतिहास रचला आहे. पाकिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्यात त्याने महान भारतीय फलंदाज सचिन तेंडुलकरचा सर्वाधिक कसोटी अर्धशतकांचा विक्रम मोडीत काढला. रूटच्या या धडाकेबाज कामगिरीच्या जोरावर इंग्लंडने पाकिस्तानचा ८ गडी राखून पराभव करत तीन सामन्यांची मालिका ३–०ने जिंकली.



बर्मिंगहॅमच्या एजबॅस्टन मैदानावर १३० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना जो रूटने अवघ्या ३९ चेंडूंत ९ चौकारांच्या मदतीने नाबाद ६२ धावांची खेळी केली. या अर्धशतकासह कसोटी क्रिकेटमधील रूटच्या अर्धशतकांची संख्या आता ६९ वर पोहोचली आहे. यापूर्वी ६८ अर्धशतकांसह सचिन तेंडुलकर अव्वल स्थानावर होता. या यादीत आता वेस्ट इंडिजचा शिवनारायण चंद्रपॉल (६६), ऑस्ट्रेलियाचा ॲलन बॉर्डर (६३), भारताचा राहुल द्रविड (६३) आणि रिकी पाँटिंग (६२) यांच्यासारख्या दिग्गजांचा समावेश आहे.

या ऐतिहासिक अर्धशतकासोबतच जो रूटने आणखी एक खास टप्पा पार केला. एजबॅस्टनच्या मैदानावर कसोटी क्रिकेटमध्ये १,००० धावा पूर्ण करणारा तो पहिलाच फलंदाज ठरला आहे. लॉर्ड्स (२,२०३ धावा), मँचेस्टर (१,१२८ धावा) आणि द ओव्हल (१,०५० धावा) यांच्यानंतर चार वेगवेगळ्या मैदानांवर १,०००हून अधिक कसोटी धावा करण्याचा पराक्रम रूटने केला आहे. जगात केवळ जॅक कॅलिस आणि रिकी पाँटिंग यांच्यानंतर अशी कामगिरी करणारा तो तिसराच फलंदाज बनला आहे. एजबॅस्टन कसोटीत प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा पहिला डाव अवघ्या १३३ धावांत आटोपला होता.




सौजन्य : अनिता वासुदेव पाटील, नगरसेविका पमपा


# विंडीजविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघात मोठे बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील तीन सामन्यांची वनडे मालिका २७ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. या मालिकेसाठी टीम इंडियाचा संघ अद्याप जाहीर झालेला नाही. विशेष म्हणजे याच काळात भारतीय संघ २०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेट स्पर्धेतही सहभागी होणार आहे. परिणामी भारतीय संघ एकाच वेळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी खेळताना दिसतील. आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारे खेळाडू वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी उपलब्ध नसतील.

टी–२० आणि वनडे अशा दोन्ही संघांचा भाग असलेल्या काही भारतीय खेळाडूंना आशियाई क्रीडा स्पर्धेमुळे वेस्ट इंडिजविरुद्धची मालिका मुकावी लागू शकते. जसप्रीत बुमराह, श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांसारखे खेळाडू आशियाई क्रीडा स्पर्धेत व्यस्त असतील.




सौजन्य : भारतीय जनता पार्टी, उलवे नोड





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com